मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

# वृत्तमानस

https://epapervrittamanas. in/

मुंबई/ पालघर | शनिवार, १६ ऑगस्ट २०२५ | वर्ष- ३० | अंक-५६ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail. com

## मी संघर्ष थांबवला, ट्रम्प यांचा पुनरूच्चार

**वॉशिंग्टन :** पहलगाम हल्ल्यानंतर झालेल्या भारत-पाकिस्तान संघर्ष मीच थांबवला या वाक्याचा पुनरूच्चार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आजही केला. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील गंभीर संघर्ष अणुयुद्धात रुपांतरित होऊ शकला असता, तो मी थांबवला असे ते म्हणाले. व्हाईट हाऊसच्या ओव्हल ऑफिसमध्ये मीडियाशी बोलताना ट्रम्प म्हणाले की, "भारत आणि पाकिस्तान एकमेकांची लढाऊ विमाने पाडत होते. एकूण 6-7 विमाने पाडण्यात आली. परिस्थिती इतकीत तणावपूर्ण होती की दोन्ही देश अण्वस्त्र वापरण्यासही तयार होते. मात्र, आम्ही हा संघर्ष शांततेने सोडवला.''



19 ऑगस्टला राज्यात कंत्राटदारांचे आंदोलन

पान 3

# RSS जगातील सर्वात मोठी NGO

**प्रतिनिधी**
■ **नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी देशवासियांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देत लाल किल्ल्यावर सलग 12 व्यांदा ध्वजारोहण केले. यावेळी देशाला संबोधित करताना त्यांनी RSS म्हणजेच राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे कौतुक केले. देशवासियांना केलेल्या संबोधनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी RSSचे कौतुक केले आहे. याची राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कौतुक केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वर्णन जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी संस्था आहे, असे ते म्हणाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने 100 वर्षे देशाची सेवा केली आहे. संघाच्या 100 वर्षांच्या सेवेचा देशाला अभिमान आहे. संघ राष्ट्र उभारणीसाठी काम करतो. राष्ट्र उभारणीसाठी समर्पित आरएसएस जगातील सर्वात मोठी स्वंयसेवी संस्था आहे, अशा शब्दांत मोदी यांनी राष्ट्र उभारणीत RSS च्या कामाचे त्यांनी कौतुक केले.

आपण अभिमानाने सांगू इच्छितो की 100 वर्षांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) ही संघटना जन्माला आली. राष्ट्राची 100 वर्षे सेवा हा एक अभिमानास्पद, सुवर्ण अध्याय आहे. व्यक्ति निर्माण से राष्ट्र निर्माण या संकल्पाने, माँ भारतीच्या कल्याणाच्या उद्देशाने, स्वयंसेवकांनी आपले जीवन आपल्या मातृभूमीच्या कल्याणासाठी समर्पित केले अशा प्रकारे, आरएसएस ही जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी संस्था आहे. त्यांना 100 वर्षांच्या समर्पणाचा इतिहास आहे, असे मोदी म्हणाले. देशाला केलेल्या संबोधनात पंतप्रधान मोदी यांनी RSS चे कौतुक केल्याने याची चर्चा होत आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून दोन घोषणा केल्या आहेत. त्यांनी 'पंतप्रधान विकासित भारत रोजगार योजना' सुरू केली. दिवाळीपर्यंत कर कमी करणारी जीएसटी सुधारणा योजना आणण्याबद्दलही त्यांनी सांगितले.

## GST सुधारणांची दिवाळी भेट
## 3.5 कोटी नोकऱ्यांसाठी नवीन योजना



पान 5 वर

### सत्तेच्या हव्यासापोटी भाजप कोणत्याही थराला जाईल!

**नवी दिल्ली:** सत्ताधारी भाजप सत्तेसाठी कोणत्याही थराला जाईल, असा आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी शुक्रवारी केला. देशभरामधील निवडणुकांमध्ये अनेक अनियमितता समोर येत असल्याचे ते म्हणाले. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी शुक्रवारी आरोप केला की सत्ताधारी भाजप सत्तेत राहण्यासाठी कोणत्याही थराला अनैतिकतेला जाण्यास तयार आहे आणि देशभरात निवडणुकांमध्ये अनेक "अनियमितता" समोर येत आहेत याचा पुनरुच्चार केला. इंदिरा भवन काँग्रेस मुख्यालयात राष्ट्रध्वज फडकवल्यानंतर स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात त्यांनी आरोप केला की, बिहार मतदार यादीच्या विशेष पडताळणी म्हणजेच एसआयआर प्रक्रियेच्या नावाखाली विरोधकांची मते उघडपणे कापली जात आहेत. तर जिवंत लोकांना मृत घोषित केले जात आहे. काँग्रेस अध्यक्ष म्हणाले की, ६५ लाख लोकांची मते कापली जाण्यावर भाजपला कोणताही आक्षेप नाही. यावरून हे दिसून येते की एसआयआरचा फायदा कोणाला झाला. ही निवडणूक जिंकण्याची लढाई नाही तर भारताची लोकशाही वाचवण्यासाठी आणि संविधानाचे रक्षण करण्यासाठी आहे, असे खर्गे यांनी बिहार मतदार यादीच्या सुधारणांना काँग्रेसच्या विरोधाचा संदर्भ देत म्हटले.



# नरेंद्र मोदी वाघ आहेत - शिंदे

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**



वाघाचे कातडे पांघरून लांडगा वाघ होत नाही. 'गिधडं भभकी' ला भारत घाबरत नाही. त्यामुळे 'शेर शेर होता है' आणि त्या वाघाचे नाव आहे, नरेंद्र मोदी हे मी अभिमाने सांगतो, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतनाच्या लोकार्पण सोहळ्यावेळी केले.

ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृहाच्या नुतनीकृत वास्तूचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी शिंदे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

पहलगाममध्ये आपल्या बहिणींचे कुंकू पुसण्याचे पाप ज्या दहशतवादी पाकिस्तानने केले, त्याला धडा शिकवण्याचे काम नरेंद्र मोदी आणि आपल्या भारतीय लष्कराने केले, असे एकनाथ शिंदे म्हणाले. 'ऑपरेशन सिंदूर, ऑपरेशन महादेवच्या माध्यमातून पाकिस्तानला चोख उत्तर देण्याचे काम, जे देशवासी यांच्या मनामध्ये होते ते त्यांनी करून दाखवले. आजही त्यांनी देशाच्या सुरक्षेसाठी सुदर्शन चक्र मिशन सुरू केले आहे. त्यामुळे देशाची सुरक्षा आणि या देशातील जनता याबद्दल कधीही तडजोड करणार नाही असे ट्रम्पला ठासून सांगणारे नरेंद्र मोदी हे या देशाचे प्रधानमंत्री आहेत. पाकिस्तानी कारवायांच्या विरुद्ध कारवाई करण्याची हिम्मत मोदींनी दाखवली असेही शिंदे म्हणाले.

## ज्ञानेश्वरीतील विश्वात्मक विचार जगाला मार्गदर्शक

**प्रतिनिधी**
■ **पुणे**



संत ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानाद्वारे अखिल विश्वाच्या कल्याणाची भावना मांडली आहे. ज्ञानेश्वरीतील हा विश्वात्मक विचार भारतीय संस्कृतीचे मूळ असून तो जगाला मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण जयंती दिनानिमित्त आयोजित संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी मंदिरावर सुवर्ण कलशारोहण समारंभात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आपल्या संस्कृतीतील प्राचीन मूल्ये जपण्याचे श्रेय वारकरी संप्रदायाला आहे. ही मूल्य विचारांची परंपरा पुढच्या पिढीपर्यंत नेल्याने आम्ही परकीय आक्रमण होत असताना राजकीय गुलामगिरी स्वीकारली, पण वैचारिक गुलामगिरी स्वीकारली नाही. वारकरी परंपरेने आणि संतांनी जात, धर्म भेदामुळे गुलामगिरीत जाणाऱ्या समाजात ऐक्य निर्माण करण्याचे कार्य केले. माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून हीच शिकवण दिली आहे, 21 वर्षांच्या जीवनात त्यांनी दिलेला विचार आपल्याला शतकानुशतके मार्ग दाखविणारा आहे. म्हणूनच समाधी मंदिरात आल्यावर चांगले काम करण्याची ऊर्जा मिळते, असे त्यांनी सांगितले. विचार आणि तत्वज्ञानाचा निर्मळ प्रवाह असलेली भारतीय सभ्यता सर्वात जुनी सभ्यता आहे हे जगाने मान्य केले असल्याचेही ते म्हणाले. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा देऊन मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, अर्जुनाला कर्म मार्ग दाखविण्यासाठी भगवान योगेश्वराने गीता सांगितली, गीतेचे मराठीत विवेचन करणाऱ्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधी मंदिरावर सुवर्ण कळस आजच्या दिवशी चढविला जाणे हा एक सुवर्णयोग आहे.

भक्तांनी दान नव्हे तर समर्पण केल्याने हा सुवर्ण कलश चढविला गेला. सुवर्ण कलशासोबत महादजी शिंदे यांनी उभारलेल्या महाद्वाराचा जीर्णोद्धार केल्याने त्याला मूळ स्वरूप प्राप्त होईल आणि मंदिर परिसराच्या पावित्र्यात भर पडेल. भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान हे जगातले सर्वोत्तम तत्त्वज्ञान असून ते जगात स्वीकारले जात आहे. माऊलींनी 9 हजार ओव्यांच्या माध्यमातून मांडलेले हे ज्ञान ऑडिओ बुकच्या माध्यमातून सर्व भाषेत उपलब्ध होणार असल्याने ते जगभरात पोहोचेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

## महत्त्वाचे

### ऑस्ट्रेलियात खलिस्तान्यांनी ध्वजारोहण रोखलं

**मेलबर्न-** ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथील भारतीय वाणिज्य दूतावासाबाहेर स्वातंत्र्य दिन साजरा करणाऱ्या भारतीय नागरिकांना खलिस्तानी समर्थकांनी रोखण्याचा प्रयत्न केला आणि गोंधळ घातला. द ऑस्ट्रेलिया टुडेच्या वृत्तानुसार, भारतीय नागरिक शांततेत स्वातंत्र्य दिन साजरा करत असताना काही खलिस्तानी समर्थकांनी झेंडे फडकावून आणि गोंधळ घालून वातावरण बिघडवले. त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावरही व्हायरल होत आहे. यामध्ये भारतीय समुदाय देशभक्तीपर गाणी गात तिरंगा ध्वज फडकवताना दिसत आहे. त्यानंतर काही खलिस्तानी त्यांना असे करण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करतात. तथापि, "भारत माता की जय" आणि "वंदे मातरम" च्या घोषणा देत समारंभात तिरंगा फडकवण्यात आला.परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. एका व्हिडिओमध्ये दोन्ही गटांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याचे दिसून आले आहे, तर पोलिस हिंसक संघर्ष रोखण्याचा प्रयत्न करत होते.

### पाकिस्तानात पुरामुळे 24 तासांत 189 जणांचा मृत्यू
#### हेलिकॉप्टरही कोसळले

**इस्लामाबाद -** पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात शुक्रवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे अचानक आलेल्या भूस्खलन आणि पुरामुळे २४ तासांत १८९ जणांचा मृत्यू झाला, ज्यात १६३ पुरुष, १४ महिला आणि १२ मुले यांचा समावेश आहे. प्रांतीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (पीडीएमए) नुसार, ६० हून अधिक लोक जखमी झाले आहेत, तर अनेकजण बेपत्ता आहेत. खैबरमध्ये बचाव कार्यादरम्यान एक हेलिकॉप्टर कोसळले, त्यात दोन वैमानिकांसह पाच जणांचा मृत्यू झाला. खैबरचा बुनेर जिल्हा सर्वात जास्त प्रभावित झाला, जिथे ९१ लोकांचा मृत्यू झाला. याव्यतिरिक्त, स्वातमध्ये २६ घरे, तीन शाळा आणि आठ इतर इमारती उद्ध्वस्त झाल्या. २१ ऑगस्टपर्यंत अधूनमधून मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे पीडीएमएने म्हटले आहे. त्याच वेळी, खैबर सरकारने बाधित जिल्ह्यांसाठी ५० कोटी पाकिस्तानी रुपयांचा मदत निधी जारी केला आहे.

### निगडीत चेंबरमध्ये गुदमरून तीन कामगारांचा मृत्यू

**पिंपरी -** स्वातंत्र्यदिनाच्या सकाळी देशभरात तिरंगा फडकवून देशभक्तीची गाणी सुरू असतानाच निगडी प्राधिकरण परिसरात तीन कंत्राटी कामगारांचा मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. बीएसएनएलच्या इन्स्पेक्शन चेंबरमध्ये ऑप्टिकल फायबरचे काम करताना गुदमरून तीन कंत्राटी कामगारांचा मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना दुपारी निगडी प्राधिकरण सेक्टर क्रमांक २७, प्लॉट क्रमांक ६५ समोर रस्त्याच्या कडेला असलेल्या बीएसएनएलच्या चेंबरमध्ये घडली. दत्ता होलारे, लखन धावरे (दोघेही रा. गुरुद्वारा चौक, आकुर्डी) आणि साहेबराव गिरसेप (रा. बिजलीनगर) अशी मृत कामगारांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बीएसएनएल आकुर्डी कार्यालयातील तीन कंत्राटी कामगार नेहमीप्रमाणे रोजच्या कामावर गेले होते. मात्र, चेंबरमध्ये उतरल्यावर हवाबंद जागेत गुदमरल्याने ते बाहेर येऊ शकले नाहीत.

# एकनाथ शिंदेंना लॉटरी लागली, पण मिळालेलं टिकवता आलं पाहिजे!

## वनमंत्री गणेश नाईकांचा टोला

**प्रतिनिधी**
■ **पालघर**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लॉटरी लागली, पण मिळालेलं टिकवता आलं पाहिजे असा टोला राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी लगावला. पालघरमधील दुर्वेश येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी गणेश नाईक बोलत होते. लॉटरी प्रत्येकाला लागत नाही. मात्र, लागलेल्याने ती योग्य टिकवली पाहिजे, असं सांगत गणेश नाईक यांनी एकनाथ शिंदे यांना चिमटा काढला.





प्रत्येकाचे नशीब आहे. एकनाथ शिंदे यांना लॉटरी लागली आनंदीची गोष्ट असल्याचे गणेश नाईक म्हणाले. पण कमवलेलं टिकवता आलं पाहिजे. किती कमवलं आणि कसं कमवलं आणि किती टिकवलं हे महत्वाचं असल्याचे गणेश नाईक म्हणाले. नाईकांच्या या टोमण्यावरुन शिंदे आणि त्यांच्यामध्ये वाद होण्याचीही शक्यता आहे.

# छत्रपती संभाजीनगर आणि अमरावतीत ढगफुटी; अनेकांचे संसार रस्त्यावर...

**प्रतिनिधी**
■ **संभाजीनगर**

राज्यातील काही जिल्ह्यांत पावसाने हाहाकार केला आहे. छत्रपती संभाजीनगर आणि अमरावतीच्या चांदूरबाजार तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस पाहायला मिळत आहे. मुसळधार पावसाने सगळीकडे पाणीच पाणी झालंय. मुसळधार पावसामुळे एनडीआरएफची टीम नागरिकांच्या मदतीला धावून गेली आहे.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यात ढगफुटी सुदृश्य पावसाने काही क्षणात हाहाकार केला आहे. मुसळधार पावसाने सगळीकडे पाणीच पाणी झाल्याचे दिसत आहे.

करमाड, छत्रपती संभजीनगर तालुक्यातील आज दुपारी तीन वाजेच्या दरम्यान ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. यामुळे कूबेर गेवराई, बनगाव, जयपुर, वरझडी परिसरात झालेल्या पावसाने लाहूकी नदीला मोठा पूर आला. या पूराचे पाणी कूबेर गेवराई,बनगाव येथील अनेक घरात शिरल्याने नुकसान झाले. जोरदार पावसामुळे काही ठिकाणी शेती खरडून पिकांचे मोठे नुकसान झालं आहे.

अमरावतीच्या चांदूरबाजार तालुक्यात ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने सगळीकडे पाणीच पाणी पाहायला मिळालं. चांदूरबाजारच्या माधान गावात अनेक घरात पाणी शिरल्याने गावात एनडीआरएफची टीम दाखल झाली. एनडीआरएफची टीम बचाव कार्यासाठी तातडीने दाखल झाली. ढगफुटी सदृश्य पावसाने माधान गावातील अनेक घर जमीनदोस्त झाली आहेत. अनेक घरात मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने गृपयोगी साहित्य आणि अन्न धान्याचे मोठे नुकसान झाले आहेत. संभाजीनगर - जळगाव राष्ट्रीय महामार्गावर पावसाच्या पाण्याचा ओढा झाल्याचे दिसत आहे. छत्रपती संभाजीनगर-जळगाव राष्ट्रीय महामार्गावर पुरसारखी स्थिती झाली आहे. महामार्गाला नदीचं स्वरूप आलं आहे. तर अजिंठा लेणीकडून येणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांची वाहने काही तास अडकली होती. त्यामुळे संभाजीनगरजवळील चौकाजवळ डोंगरातून रस्ता तयार करण्यात आला. पावसाचे पाणी ओढ्यासारखे रस्त्यावर आल्यानं रस्त्याच्या कामाचीही पोलखोल झाली आहे.

# सुप्रीम कोर्ट हायकोर्टापेक्षा मोठे नाही, दोघेही समान

**प्रतिनिधी**
■ **नवी दिल्ली**



भारताचे सरन्यायाधीश (CJI) बीआर गवई म्हणाले की, कॉलेजियम प्रणालीमध्ये सर्वोच्च न्यायालय उच्च न्यायालयापेक्षा मोठे नाही. दोन्हीही संवैधानिक न्यायालये आहेत आणि त्यापैकी कोणीही दुसऱ्यापेक्षा मोठे किंवा लहान नाही.

सर्वोच्च न्यायालयाचे कॉलेजियम न्यायाधीश पदासाठी उच्च न्यायालयाच्या कॉलेजियमला विशिष्ट नावाची शिफारस करू शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. आज सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशन (SCBA) द्वारे आयोजित ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या समारंभात न्यायमूर्ती गवई बोलत होते. गवई म्हणाले की, न्यायाधीशांच्या नियुक्तीची प्राथमिक जबाबदारी उच्च न्यायालयाच्या कॉलेजियमची आहे. सर्वोच्च न्यायालय फक्त नावे सुचवू शकते आणि उच्च न्यायालयाला नावे विचारात घेण्याची विनंती करू शकते. उच्च न्यायालयाच्या संमतीनंतरच ती नावे सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमकडे पोहोचतात.

## — पालिका प्रशासनाच्या नाकावर टीच्चून —
# आव्हाड आणि जलिल यांचा मांसाहारावर ताव

**प्रतिनिधी**
■ **कल्याण/संभाजीनगर**





राज्यातील काही महापालिकांनी आज खाटीक खाणं बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. दरम्यान याचाच निषेध म्हणून विरोधकांकडून नॉनव्हेज पार्टीचं आयोजन करण्यात आलं होतं. संभाजीनगरात जलीलांनी मटणावर ताव मारत थेट पालिका आयुक्तांनाच निमंत्रण दिलं. तर कल्याण-डोंबिवलीत जितेंद्र आव्हाडांकडून चिकन-मटण खात प्रशासनाचा निषेध नोंदवण्यात आला.

राज्यातल्या वेगवेगळ्या महापालिकांनी केलेल्या मांसबंदीचा निषेध करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये माजी खासदार इम्तियाज जलील यांनी ही अशी नॉनव्हेज पार्टी केली. स्वतः तर चिकन मटणावर ताव मारलाच, शिवाय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसाठीही मेजवानीची खुर्ची ठेवली. देशातला सर्वात मोठा सण साजरा करण्यासाठी नॉनव्हेज पार्टी दिल्याचं त्यांनी सांगितलं. तिकडे कल्याण-डोंबिवलीतही राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी नॉनव्हेज पार्टीचं आयोजन केलं होतं. आव्हाडांनी पार्टीत मटण बिर्याणी, चिकन बिर्याणी, कोळंबी आणि पापलेटवर ताव मारला.

# इराणने अमेरिका, इस्त्रायलसाठी हेरगिरी करणारे 21000 गुप्तहेर पकडले

■ **तेहरान**

इराणने अमेरिकेसोबत व इस्त्रायलसोबत झालेल्या 12 दिवसांच्या युद्धानंतर देशभरात व्यापक पातळीवर गुप्तहेर शोध मोहीम सुरू केली आहे. गेल्या दोन महिन्यांत देशभरात विविध ठिकाणी पोलिस छाप्यांदरम्यान 21,000 पेक्षा अधिक जणांना अमेरिकेसोबत व इस्त्रायलसोबत गुप्तहेरगिरी केल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली आहे.

यामध्ये सामान्य नागरिक, शास्त्रज्ञ, अणुउर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ, डॉक्टर, अभियंते आदींचा समावेश आहे. इराणच्या कायदा व सुव्यवस्था विभागाचे प्रवक्ते सईद मोंताझेरोलमहदी यांनी दिलेल्या माहितीनुसार, इस्त्रायल व अमेरिकेच्या हल्ल्यांनंतर नागरिकांकडून संशयितांविषयी मिळालेल्या तक्रारींमध्ये 41 टक्के वाढ झाली असून त्यावरूनच ही कारवाई करण्यात आली आहे.इराणने सात जणांना इस्त्रायलसाठी गुप्तहेरगिरी केल्याच्या आरोपावरून फाशी दिली आहे.

## दिल्लीतील हुमायूं मकबरा परिसरात छत कोसळले, 6 ठार




**नवी दिल्ली ।** दिल्लीतील हुमायूनच्या थडग्याच्या परिसरात एका खोलीचे छत कोसळले. आग्नेय दिल्लीचे डीएम डॉ. श्रवण बगडिया यांच्या मते, सुमारे १० जणांना वाचवण्यात आले. त्यापैकी ६ जणांचा मृत्यू झाला. डीएम म्हणाले की, हे लोक एएसआयच्या जागेवर बेकायदेशीरपणे राहत होते हे समोर आले आहे. कोणी बेकायदेशीरपणे कसे राहत होते हे तपासण्याचा विषय आहे, जर हे खरे असेल तर कारवाई केली जाईल. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# बंगालमधील बर्दवानमध्ये भीषण अपघात, 10 जणांचा मृत्यू

## 35 जण जखमी; गंगासागरहून यात्रेकरुंना घेऊन परतत होती बस

■ **बर्दवान**

बंगालमधील पूर्व बर्दवान येथील नाला फेरी घाटावर यात्रेकरूंनी भरलेली बस एका उभ्या असलेल्या ट्रकला धडकली. या अपघातात १० जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ५ मुलांचाही समावेश आहे, तर ३५ जण जखमी आहेत. जखमींवर बर्दवान मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत.






मिळालेल्या माहितीनुसार, बस गंगासागरहून बिहारमधील ४५ यात्रेकरूंना घेऊन परतत होती. वेगाने येणाऱ्या बसचा चालक झोपी गेला आणि त्याला राष्ट्रीय महामार्ग-१९ वर उभा असलेला ट्रक दिसला नाही. या धडकेत बसचा पुढचा भाग मोठ्या प्रमाणात खराब झाला. पोलिसांनी सांगितले की, यात्रेकरूंनी ८ ऑगस्ट रोजी मोतिहारी येथून आपला प्रवास सुरू केला. ते प्रथम देवघर आणि नंतर गंगासागरला गेले.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त स्पार्टन्स तर्फे वृक्षारोपण

**तलासरी :** दर वर्षीप्रमाणे यावर्षी देखील स्पार्टन्स टीम च्या वतीने 15 ऑगस्ट भारत स्वातंत्र्य दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. बुलेट ट्रेन, सुपर हायवे या सारख्या प्रकल्पा साठी मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल होत आहे त्यासाठी निसर्गाचे सवर्धन करण्यासाठी एक प्रयत्न म्हणजे वृक्षारोपण करणे अती गरजेचे आहे. स्वातंत्र्य दिना निमित्त वृक्षारोपण करत स्पार्टन्स टीम ने एक महत्वाचा संदेश समाजापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला आहे की पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण करणे खूप महत्वाचे आहे व सर्वांनी आपापल्या परीने पुढाकार घेऊन वृक्षारोपण करावे व पर्यावरण संवर्धनासाठी मोलाचे योगदान द्यावे. गेली पाच वर्षे स्पार्टन्स टीम करजगवा मध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण करत आहे. यावर्षी कराजगाव पाटीलपाडा येथे झाडे लावण्यात आली. हे वृक्षारोपण करण्यासाठी करजगाव पाटीलपाडा पेशा सदस्य मा. दिपक ठाकरे व स्पार्टन्स टीम चे सदस्य प्रशांत उराडे, विशाल ठाकरे, बालकृष्ण उराडे, नरेश घुटे, केशू शिंगडा, सुरेश बेंदर, गणपत मांगात, मनोज ठाकरे, किशोर ठाकरे, सूरज बेंदर, अविनाश बेंदर, हे उपस्थित होते.



## थोडक्यात

### मध्य रेल्वेचा शनिवार/रविवार मध्यरात्री मेगाब्लॉक

**मुंबई:** मध्य रेल्वे, मुंबई विभागात विविध अभियांत्रिकी आणि देखभालीच्या कामांसाठी १६/१७.०८.२०२५ (शनिवार/रविवार मध्यरात्री) रोजी उपनगरीय विभागात मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. हा ब्लॉक विद्याविहार आणि ठाणे दरम्यान ५व्या आणि ६व्या मार्गिकेवर १६/१७.०८.२०२५ (शनिवार/रविवार मध्यरात्री) रोजी ००.४० वाजल्यापासून ते १७.०८.२०२५ रोजी (पहाटे) ०४.४० वाजेपर्यंत राहणार आहे. ब्लॉकमुळे होणारे डाऊन मेल व एक्स्प्रेस गाड्यांचे डाइव्हर्शन ,डाउन ५व्या मार्गावर धावणाऱ्या मेल व एक्स्प्रेस गाड्या विद्याविहार ते ठाणे / कल्याण स्थानकांदरम्यान डाउन जलद मार्गावर वळवण्यात येतील व ब्लॉकदरम्यान १० ते १५ मिनिटे उशिरा सोपवण्यात येणार आहे तसेच अप मेल व एक्स्प्रेस गाड्यांचे वळण ब्लॉक दरम्यान ६व्या मार्गावर धावणाऱ्या मेल व एक्स्प्रेस गाड्या कल्याण/दिवा आणि विद्याविहार स्थानकांदरम्यान अप जलद लाईनवर वळवल्या जातील आणि १० ते १५ मिनिटे उशिराने पोहोचेल. उशिराने धावणाऱ्या मेल/एक्स्प्रेस गाड्या/विशेष गाड्या परिचलनाच्या आवयकशकते प्रमाणे वळवण्यात येतील.
दिवसा मेन लाईन आणि हार्बर/ट्रान्स हार्बर लाईनवर कोणताही मेगा ब्लॉक चालवला जाणार नाही.असेही मध्य रेल्वेने कळविले आहे.

### बेस्टच्या भाडेतत्त्वावरील बस गाडीमध्ये वायरिंगला आग

**मुंबई:** बस मार्ग क्रमांक ३९७ अनुक्रमांक ३३ बस गाडी क्र. ७०३९ SMTATPL ( मारुती ट्रॅव्हल्स) ही भाडेतत्त्वावरील बस काल दुपारी ३.२५ वाजता विक्रोळी स्थानक येथून कन्नमवार नगर कडे जात असताना प्रगती विद्यालयाजवळ आली असता बस गाडीच्या केबिन मधील वायरिंग जळाल्यामुळे बस गाडीच्या केबिनमध्ये पूर्णतः धूर झाला. बस चालक व वाहक यांनी प्रसंगावधान राखत बस गाडीतील अग्निशामक उपकरण वापरून सदर आगीवर नियंत्रण मिळवले तसेच त्याबाबतचा संदेश अग्निशमन दलाला देखील दिला. सदर घटनेमध्ये कोणासही इजा झालेली नाही. असे बेस्ट कडून सांगण्यात आले.

### 23 व्या मजल्यावरून उडी मारून मुलीची आत्महत्या

**मुंबई:** गोरेगावमधील ओबेरॉय संकुलातील बहुमजली इमारतीच्या २३ व्या मजल्यावरून उडी मारून १७ वर्षीय तरूणीने आत्महत्या केली. नैराश्यामुळे तिने आत्महत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले. विशेष म्हणजे याच ओबेरॉय संकुलातील आत्महत्येची ही चौथी घटना आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## वसईत आज दहीहंड्यांचा थरार

# 1374 दहीहंड्या, राजकीय शक्ती प्रदर्शन आणि सेलिब्रिटींची रंगत

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसईत आज (शनिवार) गोपाळकाला उत्सवाचा जल्लोष रंगणार असून तालुक्यात 1374 दहीहंड्यांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये 288 सार्वजनिक आणि 1086 खाजगी दहीहंड्यांचा समावेश असून सकाळपासून रात्रीपर्यंत गोविंदाप्रेमींच्या जल्लोषाचा महापूर उसळणार आहे.



यंदाची दहीहंडी केवळ धार्मिक उत्साहापुरती मर्यादित न राहता आगामी वसई-विरार महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय शक्ती प्रदर्शनाचे व्यासपीठ ठरणार आहे. त्यामुळे 'राजकीय दहीहंड्या' हे यंदाचे प्रमुख आकर्षण ठरणार असून पालघर जिल्ह्याचे विशेषतः वसई तालुक्याचे लक्ष याकडे लागले आहे.वसई-विरार महापालिकेने गोविंदा पथकांसाठी विमा संरक्षण उतरवले आहे. आकर्षक बक्षिसांच्या दहीहंड्या फोडण्यासाठी स्थानिक पथकांसह मीरा-भाईंदर, पालघर, ठाणे, मुंबई येथील गोविंदा पथकेही वसईत दाखल होणार आहेत. 'मच गया शोर सारी नगरी रे, गोविंदा रे गोपाळा'च्या तालावर थरांचा थरार रंगणार असून गोविंदाप्रेमींच्या स्वागतासाठी आयोजकांनी विशेष तयारी केली आहे.

दरम्यान, राजकीय दहीहंड्यांच्या व्यासपीठावर नामांकित सेलिब्रिटी उपस्थित राहणार असून त्यांच्या स्वागतासाठी चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी आणि संभाव्य वाहतूककोंडी लक्षात घेऊन पोलिसांचा कडक बंदोबस्त असणार आहे.एकूणच आज वसईत दहीहंडीचा उत्साह, थरांचा थरार आणि राजकीय रंगत यांचा संगम पाहायला मिळणार आहे.

## वसई-विरार पालिकेचा विस्तार

# 29 गावांचा समावेश; विकासाला मिळणार नवी गती

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सीमा अखेर अधिकृतपणे वाढल्या असून परिसरातील तब्बल २९ महसुली गावे आता पालिकेच्या हद्दीत आली आहेत. राज्य शासनाने मंगळवार, १३ ऑगस्ट २०२४ रोजी अंतिम अधिसूचना जाहीर करून हा ऐतिहासिक निर्णय अमलात आणला आहे. या निर्णयाने महानगरपालिकेच्या क्षेत्रफळात लक्षणीय वाढ होणार असून नव्या गावांच्या नियोजनबद्ध विकासाला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अधिकारांचा वापर करून नगरविकास विभागाने हा निर्णय घेतला. याआधी २४ फेब्रुवारी २०२४ रोजी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध करून नागरिकांकडून हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या होत्या. कोकण विभागीय आयुक्तांच्या सुनावणीनंतर आलेल्या अहवालाच्या आधारे शासनाने हरकतींचा विचार करून अंतिम शिक्कामोर्तब केले.

**समाविष्ट झालेली २९ गावे**

अधिसूचनेनुसार समाविष्ट गावे अशी: आगाशी, कोपरड, वाघोली, ससुनवघर, भुईगांव बु., भुईगांव खु., गास, गिरीज, कौलार बु., कौलार खु., नबाळे, निर्मळ, वाघोली, दहिसर, नाळे, रांजोडी, वटार, चांदीप, कशिद कोपर, कसराळी, कोशिंबे, चिंचोटी, देवदळ, कामण, कनेर, कोल्ही, मांडवी, शिरसाड, सालोली.

**नवीन सीमा**

| | | |
|---|---|---|
| उत्तर | : | वैतरणा खाडी |
| दक्षिण | : | ससुनवघर व वसई खाडी |
| पूर्व | : | पेलहर, चिंचोटी गावांची सीमा |
| पश्चिम | : | अर्नाळा सागरी किनारा |

या निर्णयामुळे नव्याने समाविष्ट गावांना पायाभूत सुविधा, शहरी नियोजन आणि विकासकामांचा लाभ मिळण्याची शक्यता आहे. राज्यपालांच्या आदेशानुसार काढलेल्या अधिसूचनेला स्थानिक पातळीवर मोठी दाद मिळणार असून वसई-विरार परिसराचा विकास नवा टप्पा गाठेल, अशी अपेक्षा आहे.

## पुढचा नंबर कोणाचा?

# ईडीच्या कारवाईनंतर पालिकेत खळबळ

### कनिष्ठ अधिकारी, आर्किटेक्ट व अभियंतेही रडारवर...

**प्रतिनिधी**
■ **वसई**

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील भ्रष्टाचार प्रकरणात माजी आयुक्त अनिलकुमार पवार, नगररचना उपसंचालक वाय. एस. रेड्डी आणि विकासक सीताराम गुप्ता व अरुण गुप्ता यांच्यावर सक्त वसुली संचालनालयाने (ईडी) केलेल्या कारवाईनंतर आता "पुढचा नंबर कोणाचा?" हा प्रश्न शहरात चर्चेचा विषय ठरला आहे.

नालासोपारा पूर्वेतील आचोळे येथील आरक्षित क्षेपणभूमी व मलनिस्सारन भूखंडावर बेकायदेशीर ४१ इमारती उभारण्यात महापालिका अधिकाऱ्यांचा संगनमताचा आरोप आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर या सर्व इमारती पाडण्यात आल्या. त्यानंतर ईडीने रेड्डी यांच्या ठिकाणी छापेमारी करून तब्बल साडेनऊ कोटींची रोकड जप्त केली. लगेचच माजी आयुक्त पवार यांच्या १२ ठिकाणी छापेमारी करून १.३३ कोटींची रोकड हस्तगत केली. चौकशीत पवार यांनी 'प्रति फूट' वसुलीचे कबुलीजबाब दिल्यानंतर चौघांवर अटक करण्यात आली.

या घडामोडींनंतर कनिष्ठ अभियंते, आर्किटेक्ट, लायझनर्स आणि इतर कनिष्ठ अधिकारी देखील ईडीच्या रडारवर असल्याची चर्चा आहे. भ्रष्टाचाराची संपूर्ण साखळी उघडकीस आणून सर्व संबंधितांवर तुरुंगवासाची कारवाई करावी, अशी मागणी नागरिक आणि राजकीय वर्तुळातून जोर धरू लागली आहे. आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनंतर ईडीच्या जाळ्यात कोणते 'मासे' अडकतात, हे पाहण्यासाठी वसई-विरारचे डोळे कारवाईकडे लागले आहेत.

# दिंडोशीत आ. राजहंस सिंह यांनी केले ध्वजारोहण आणि काढली तिरंगा यात्रा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

15 ऑगस्ट - स्वातंत्र्य दिना च्या निमित्ताने भाजपा - दिंडोशी च्या वतीने दिंडोशी जनसंपर्क कार्यालय येथे आमदार राजहंस सिंह* यांच्या हस्ते ध्वजारोहण मोठ्या उत्साहात करण्यात आले.व सामूहिक राष्ट्रगीत म्हटले गेले. त्यानंतर कार्यालयापासून साईबाबा मंदिर, कुरार पर्यंत "भारत माता की जय" आणि "वंदे मातरम्" च्या जयघोषात भव्य तिरंगा पदयात्रा काढण्यात आली.

यावेळी आमदार राजहंस सिंह यांनी उपस्थितांना स्वातंत्र्य दिनाच्या आणि कृष्णा जन्माष्टमीच्या शुभेच्छा देताना आमदारराजहंस सिंह यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. देशपातळीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हेदेशाचे भक्कम नेतृत्व करीत आहेत तरमहाराष्ट्राच्या व मुंबईच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी निर्णय घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेसमोर एक वेगळी छाप निर्माण केली आहे. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर आपण सर्व कार्यकर्त्यांनी पंतप्रधान व मुख्यमंत्री यांच्या कार्याचा आणि केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार जनतेच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार करून मुंबई महापालिकेवर विजय मिळवण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी भाजपा-दिंडोशी मधील जिल्हा, मंडळ, माजी नगरसेवक, वॉर्ड, मोर्चा व आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 100 कोटींच्या व्याजासंदर्भात पॅलेस रॉयल डेव्हलपरवर महारेराची कारवाई!

■ **मुंबई**

पॅलेस रॉयल प्रकल्पाचे डेव्हलपर ऑनेस्ट शेल्टर्स प्रा. लि. यांनी आयआयएफएल फायनान्स व मॅनेजमेंट सर्व्हिसेसला १०० कोटी रुपयांहून अधिक व्याज न भरल्यामुळे मालमत्ता जप्तीची कारवाई सुरू झाली आहे. महाराष्ट्र रिअल इस्टेट रेग्युलेटरी प्राधिकरणाने (महारेरा) लोअर परळ येथील पॅलेस रॉयल प्रकल्पाचे डेव्हलपर ऑनेस्ट शेल्टर्स प्रा. लि. यांच्याविरोधात कठोर अंमलबजावणी कारवाई सुरू केली. १६ जानेवारी २०२५ रोजी महारेराने ऑनेस्ट शेल्टर्स प्रा. लि. यांना वर्ली इस्टेट लोअर परळ येथील पॅलेस रॉयल टॉवरमधील 8 आलिशान फ्लॅट्सचा ताबा भोगवटा प्रमाणपत्रसह व कलम १८ अंतर्गत व्याजाची रक्कम ६० दिवसांत देण्याचे आदेश दिले होते. मात्र पॅलेस रॉयल प्रकल्पाचे डेव्हलपर ऑनेस्ट शेल्टर्स प्रा. लि. यांनी त्याची पूर्तता केली नाही. मुदत संपल्यानंतर आयआयएफएल फायनान्स व मॅनेजमेंट सर्व्हिसेसने अंमलबजावणी अर्ज दाखल केला. त्यावरून महारेराने कलम ४०(१) अंतर्गत वसुली वॉरंट काढून जिल्हाधिकाऱ्यांना मालमत्ता जप्ती, बँक खाती सील करणे व इतर कायदेशीर पावले उचलण्याचे अधिकार दिले. पॅलेस रॉयल जो एकेकाळी भारतातील सर्वात उंच आलिशान निवासी प्रकल्प म्हणून ओळखला जात होता, गेली दहा वर्षे विलंब, गुंतवणूकदार वाद आणि न्यायालयीन प्रकरणांत अडकलेला आहे. प्रत्येक फ्लॅटची बाजार किंमत सुमारे ८० कोटी असून आठ फ्लॅट्सची एकूण किंमत जवळपास ६५० कोटी होते. याशिवाय 1१०० कोटींपेक्षा अधिक व्याजाची वसुली अपेक्षित आहे. तज्ञांच्या मते, ही कारवाई थकबाकीदार बांधकाम दारांसाठी कठोर इशारा आहे.

# धामणशेत येथील स्मशानभूमीची दुरावस्था; प्रशासन लक्ष देईना

**प्रतिनिधी**
■ **मोखाडा**

"इतकेच मला जाताना सरणावर कळले होते" "मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते" सुरेश भटांनी या कवितेतून मरणही सुसह्य असल्याचे सांगितले असले तरी मोखाडा तालुक्यातील धामणशेत कोशीमशेत ग्रामपंचायत मधील धामणशेत येथील स्मशानभूमीची पूर्णतः दुरावस्था झाली झाली असल्याने अंत्यविधी करताना नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो आहे



> धामणशेत येथील स्मशानभूमीचा प्रस्ताव मंजुरीला जिल्ह्याला पाठवला आहे परंतु हेतुपुरस्पर याकडे दुर्लक्ष केले जात आहे
> **- वैशाली साळवे (उपसरपंच) धामणशेत कोशीमशेत ग्रामपंचायत**

धामणशेत पाटीलपाडा ठाकूरवाडी अशी तीन गावपाड्यांची लोकसंख्या आठशे ते नऊशेच्या आसपास आहे या तिन्ही गावपाडयासाठी एक स्मशानभूमी आहे दहा ते पंधरा वर्षांपूर्वी येथे जनसुविधा योजनेअंतर्गत धामणशेत गावालगत हि स्मशानभूमी बांधण्यात आली होती परंतु आजघडीला या स्मशानभूमीची पूर्णता दुरावस्था झाली आहे छपराचा काही भाग तुटलेला असून पोल गंजले आहेत तसेच संरक्षण भिंतीला तढे गेले असून समानशानभूमीचे शेड म्हणजे लोखंडी सापळा दिसतो आहे परिणामी पावसाळयात अंत्यविधी करताना तारेवरची कसरत नागरिकांना करावी लागत आहे

.देशासह महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात ग्रामीण भागातील गावपाड्यांचा मोठा वाटा असला तरी खऱ्या अर्थाने विकासाला चालना देणारे गावपाडे आजही विकासापासून कोसो दूर आहेत मोखाडा तालुक्यातील अनेक गावपाडे आजही पाणी, रस्ते, वीज, आरोग्य सुविधा यांची प्रतिक्षा आहे. गेल्या अनेक अर्थसंकल्पात आदिवासींच्या विकासाठी मोठ मोठ्या आकड्यांची तरदूत केली जाते, पण येथील आदिवासींचा खऱ्या अर्थाने विकास मात्र होताना दिसत नाही.हेच यावरून अधोरिखीत होत आहे.

# सोनोपंत दांडेकर महाविद्यालयचा मुक्त विद्यापीठाच्या राज्यातील सर्वाधिक विद्यार्थ्यांचे केंद्र म्हणून विशेष सन्मान

■ **पालघर**

सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र गेल्या सात वर्षांपासून शैक्षणिक उत्कृष्टतेचा नवा आदर्श प्रस्थापित करत आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात केंद्रामध्ये ३५७६ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली असून, ही संख्या महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक डॉ. प्रकाश देशमुख, मुंबई विभागीय केंद्राचे संचालक डॉ. वामन नाखले, आणि ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष पारितोषिक देऊन अभ्यासकेंद्राचा गौरव करण्यात आला.



डॉ. प्रकाश देशमुख यांनी यावेळी सांगितले, "सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर येथील अभ्यासकेंद्र हे महाराष्ट्रातील पथदर्शी केंद्र ठरत असून, विविध नाविन्यपूर्ण आणि विद्यार्थ्याभिमुख उपक्रमांद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षण सेवा पुरवते. विद्यापीठाचे 'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात आणण्याचे कार्य हे केंद्र प्रभावीपणे करत आहे." या यशामागे प्राचार्य व केंद्रप्रमुख डॉ. किरण सावे यांचे दूरदर्शी नेतृत्व, केंद्र संयोजक डॉ. बाळासाहेब रहाणे, केंद्र सहाय्यक प्रा. निलेश पाटील यांचे समर्पित कार्य आणि संपूर्ण कार्यकारी संघाचा परिश्रम आहे. हे अभ्यासकेंद्र अत्यंत नियोजनबद्ध व कार्यक्षम पद्धतीने विविध शैक्षणिक योजना राबवत आहे. या कार्याबद्दल सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळीचे अध्यक्ष सीए सचिन कोरे, सचिव सुधीर कुलकर्णी, अनिल पाटील, आणि खजिनदार मंगेश पंडित यांनी अभ्यासकेंद्राचे अभिनंदन करत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देवून ग्रामीण भागातील शिक्षणापासून वंचित घटकांनी YCMOU सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाच्या अभ्यासकेंद्रात प्रवेश घेवून आपले उच्च शिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन केले.

## कॉ. गोदावरी परुळेकर यांच्या 118 व्या जयंतीनिमित्त

# कॉ. लहानू कोम यांचा पुतळा अनावरण व संग्रहालय उद्घाटन



■ **तलासरी**

गोदावरी शामराव परुळेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तलासरी येथे कॉ. गोदावरी शामराव परुळेकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण आणि आदिवासी समाजातील दुर्मिळ वस्तूंच्या संग्रहालयाचे उद्घाटन माकपचे ज्येष्ठ नेते कॉ. एल. बी. धनगर व पॉलिट ब्युरो सदस्य तसेच राष्ट्रीय अध्यक्ष किसान सभेचे डॉ. अशोक ढवळे यांच्या हस्ते संपन्न झाले. हा सोहळा दिवंगत कॉ. लहानू कोम यांच्या स्वप्नपूर्तीसारखा ठरला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुतळा अनावरणानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्थेचे संचालक डॉ. बी. ए. राजपूत आणि उपप्राचार्य आर. एन. पवार यांनी केले. उपस्थित मान्यवरांमध्ये कॉ. हेमलता कोम, आमदार कॉ. विनोद निकोले, माजी आमदार सुनिल भुसारा, उद्योजक व माजी मुंबई नगरपाल डॉ. मोहनभाई पटेल, कॉ. रुपेश राणे, संचालक कॉ. सुहास सुरती, ॲड. काशिनाथ चौधरी, नगराध्यक्ष कॉ. सुरेश भोये, कॉ. प्राची हातीवलेकर, कॉ. नंदू हडळ, कॉ. विजय खुलात, समाजसेवक हसूभाई ठक्कर, मा. अजितदादा नार्वेकर तसेच आदिवासी प्रगती मंडळाचे पदाधिकारी, माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भ्रष्टाचाराविरोधात शिक्षकांनी केले जेलभरो आंदोलन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या सुमारे ३०० शिक्षकांनी बुधवारी आझाद मैदानात मुंबईचे तत्कालीन शिक्षण उपसंचालक संदीप संगवे यांच्यावर कठोर कारवाई करावी व शिक्षक समस्यांचे त्वरित निराकरण करावे, यासाठी जेल भरो आंदोलन केले. आंदोलनानंतर शिष्टमंडळाने शिक्षण प्रधान सचिव रणजित सिंह देवोल यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देत समस्या समजावून सांगितल्या.यावेळी देवोल यांनी शासन गंभीर असून एस आय टी स्थापन केली असून त्यांच्याकडे पुराव्यासह तक्रारी नोंदवाव्यात असे आवाहन केले. तसेच विभागीय चौकशीसुद्धा लावली आहे असे त्यांनी सांगितले. शिष्टमंडळामध्ये प्रा श्रीप्रकाश दीक्षित, प्रा मुकुंद आंधळकर, प्रा रवींद्र भदाणे, प्रा सुनील पूर्णपात्रे, व शिवनाथ दराडे यांचा समावेश होता. आंदोलकांसमोर प्रा अमर सिंह यांनी आंदोलनामागची भूमिका विषद केली. या आंदोलनास महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने पाठिंबा जाहीर केला होता.



संगवे हे मुंबईला शिक्षण उपसंचालक असताना त्यांनी मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार केला, शिक्षकांची सातत्याने अडवणूक केली, समस्यांचे निराकरण केले नाही असा संघटनेचा आरोप आहे. पैसे दिल्याशिवाय कोणतेही काम होणार नाही अशी स्थिती निर्माण झाली असल्याने भ्रष्टाचार दूर करावा अशी त्यांची मागणी आहे. संगवे यांना सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्याच्यावर एस आय टी लावण्यात आली असली तरी शिक्षकांचे समाधान झालेले नाही. त्यांना लवकरात लवकर कठोर शिक्षा व्हावी असा संघटनेचा आग्रह आहे, शिक्षण विभागातील अधिकारी आंदोलन करीत असल्यामुळे त्यांना सूट मिळेल, त्यांच्यावर कठोर कारवाई होणार नाही असेही संघटनेला वाटत आहे. मुंबईत शिक्षण विभागात नियमांचे पालन होत नाही, मान्य बाबींची अंमलबजावणी होत नाही, थकीत वेतन देयके मंजूर न करता कोट्यावधी रुपये परत पाठवले जातात, नियुक्ती मान्यता पैशासाठी अडवून ठेवली जाते, ना हरकत प्रमाणपत्राची नियमबाह्य सक्ती करीत स्वतःच्या उमेदवाराची भरती करण्यासाठी सक्ती केली जाते, वेतन निश्चितीकरणा साठी लाच घेतात. श्री संगवे यांनी अनियमिततेला, शिक्षकांच्या सेवासमाप्तीला प्रोत्साहन दिले. चुकीच्या संच मान्यता करीत शिक्षकांची संख्या कमी केली, यामुळे शिक्षकांना वारंवार आंदोलने करावी लागत आहेत. असे मुंबई कार्यवाह शिवनाथ दराडे यांनी सांगितले.

यापूर्वी दि १६ एप्रिल २५ रोजी मोर्चा काढून दोषींवर कारवाई करण्यासाठी निवेदन दिले होते, दि २ मे २०२५ रोजी आझाद मैदानात धरणे धरले होते, परंतु श्री संगवे यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही, कोणतीही चौकशी करण्यात आली नाही. संगवे यांनी समस्यांचे निराकरण केले नाही. कारभारात सुधारणा केली नाही. दोषींना त्वरित शिक्षा व्हावी, शिक्षकांवरील अन्याय दूर करावा, प्रश्न तातडीने निकाली निघावेत, प्रत्येक गोष्टीसाठी शिक्षकांकडून पैसे घेण्याची कृती बंद व्हावी, वृत्ती नष्ट व्हावी, यासाठी शिक्षक जेलभरो आंदोलन केले आहे.

# मुंबई डब्बेवाला नॅशनल एक्सपीरियन्स सेंटर' च्या कार्यक्रमात डॉ. वैभव देवगीरकर यांचा सन्मान



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

'मुंबई डब्बेवाला नॅशनल एक्सपीरियन्स सेंटर' च्या उद्घाटन सोहळ्यात, देशातील विविध राज्यात आरोग्य क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवी, देवदेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. वैभव आर. देवगीरकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. वैभव आर. देवगीरकर यांचा हा सन्मान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी मंत्री आशिष शेलार व मुंबई डब्बेवाला असोसिएशनचे अध्यक्ष उल्हासभाऊ मुके व विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर मुंबई डब्बेवाला यांची उपस्थिती होती.'मुंबई डब्बेवाला नॅशनल एक्सपीरियन्स सेंटर' सुरु झाल्याने मुंबईतील डब्बेवाल्याना मोठे सहकार्य मिळणार आहे.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Thirty**
**Issu - 56**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- तीसावे**
**अंक - ५६**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## सद्गुरू आनंद बाबांचा गादी दिवस साजरा

**मुंबई:** साकीनाका लक्ष्मी नारायण मंदिर मार्ग येथील आनंद बाबा आश्रम मध्ये सद्गुरू आनंद बाबांचा गादी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने महाभंडारा आयोजित करण्यात आला होता. यावेळी सर्व भाविक भक्तांनी सदगुरु आनंद बाबांच्या समाधीची मोठ्या भक्तिभावाने पूजा अर्चा केली. १५ ऑगस्ट १९६० साली चांदिवली येथील वाघेश्वरी माता मंदिर परिसरात सद्गुरू दास किसन महाराज यांनी आनंद बाबांना गादीवर बसवले होते त्यानंतर भक्तांनी बाबांचा गादी उत्सव दिवस साजरा करण्याची परंपरा सुरु झाली. बाबांच्या भक्तांनी एकत्र येऊन १९६२ साली लक्ष्मी नारायण मंदिर मार्ग येथे आनंद बाबा आश्रम निर्माण केले तेव्हा पासून या ठिकाणी सद्गुरू आनंद बाबांचा गादी दिवस १५ ऑगस्ट ला साजरा होत असून ही परंपरा भक्त दरवर्षी उत्सव रूपात साजरा करतात. यंदा शुक्रवार दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी अष्टमी आणि सद्गुरू आनंद बाबांचा गादी उत्सव दिवस मोठ्या भक्तीभावातून साजरा करण्यात आला. यावेळी आनंद बाबा आश्रमाचे भाविक भक्त आणि ट्रस्टी उमाकांत मिश्रा, जयप्रकाश व्यास, मनोहरलाल व्यास, मगणभाई व्यास, मीना वोरा श्यामदेवी मिश्रा, आदिसह संजय गिरी, अजित मिश्रा, गिरेंद्र सिंग, अतुल मिश्रा, प्रणय साने आदीसह अनेक सदस्य उपस्थित होते. यावेळी शेकडो भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



## कंत्राटदार संघटना घेणार मोठा निर्णय
# 19 ऑगस्टला राज्यात आंदोलन

### 89 हजार कोटींची थकबाकी



प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यातील कंत्राटदारांची तब्बल 89 हजार कोटींची बिले सरकारने थकवली आहेत. त्यामुळे कंत्राटदारांची आर्थिक परिस्थिती बिघडत चालली आहे. या पैशांसाठी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना वर्षभरापासून सरकारकडे पाठपुरावा करत आहेत. मात्र, सरकार त्यांचे निवेदन, आंदोलन बेदखल करत आहे. त्यामुळे आता या संघटना आक्रमक झाल्या असून 19 ऑगस्ट रोजी ते मोठा निर्णय घेणार आहेत. हा निर्णय कोणता हे अजून गुलदस्त्यात आहे. मात्र, यासाठी 35 जिल्ह्यांमध्ये धरणे आंदोलन केले जाणार आहे.

राज्य सरकारने कंत्राटदारांचे विविध कामांचे 89 हजार कोटी रुपये थकवल्यामुळे कंत्राटदार आर्थिकदृष्ट्या कोलमडून गेले आहेत. त्यामुळे त्यांनी 15 ऑगस्टला राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला होता. तसेच अनेक कंत्राटदारांनी जीवाचे बरेवाईट करणार असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, भारताचा स्वातंत्र्यदिन असल्यामुळे असे कृत्य करू नये याची चर्चा झाली. त्यामुळे आंदोलन 19 ऑगस्ट रोजी करण्याचे ठरले. जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाकडे केलेली कामे, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग आणि अनेक विभागांकडील अंदाजे 89 हजार कोटींची बिले सरकारने अजून दिलेली नाहीत.

सरकारने झालेल्या कामाची बिले द्यावीत यासाठी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना 10 महिन्यांपासून धरणे आंदोलन, लाक्षणिक उपोषण, मोर्चा आदी लोकशाही मार्गाने संघर्ष करत आहेत. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना या विषयावर संघटनेच्या शिष्टमंडळाशी बैठक घ्यावी, यासाठी पत्रेही दिले आहेत. पण पुढे काहीही होत नसल्याने संघटनांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

राज्यात विकासाची कामे सुरू आहेत आणि त्यात कंत्राटदारांची मोठी भूमिका आहे. मात्र, कंत्राटदारांनाच त्यांची बिले दिली जात नाहीत. त्यामुळे या राज्य संघटनांची बैठक नुकताच ऑनलाईन पद्धतीने झाली. यात 35 जिल्हांमध्ये 19 ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आणि उग्र आंदोलन करण्याता निर्णय घेण्यात आला, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे राज्य अध्यक्ष मिलिंद भोसले, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे महासचिव सुनील नागराळे आणि राज्य अभियंता महासचिवचे राजेश देशमुख तसेच पाणीपुरवठा संघटनेचे सदस्य किशोर जामदार, शरद पाटील यांनी कळवले आहे.

## महानगरपालिका मुख्यालयात आयुक्त भूषण गगराणी यांच्या हस्ते झाले ध्वजारोहण

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय स्वातंत्र्याच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या हस्ते काल ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी गगराणी यांनी मुंबईकर नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, सहआयुक्त, उप आयुक्त, संचालक, सहायक आयुक्त, खातेप्रमुख, इतर अधिकारी, कर्मचारी, नागरिक यावेळी उपस्थित होते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मुंबई अग्निशमन दल आणि सुरक्षा पथकाच्या वतीने गगराणी यांना मानवंदना देण्यात आली. स्वातंत्र्य दिनानिमित्त गगराणी यांनी मुंबईकरांना संबोधित करताना ते म्हणाले की, नवीन भारताची शक्ती आणि सार्वभौमत्व टिकवण्यासाठी आपण सर्वजण सज्ज आहोत. ऑपरेशन सिंदूर नंतर भारत देशाची एक नवीन ओळख संपूर्ण जगाला झालेली आहे. ती ओळख अधिक समर्थपणे पार पाडण्यासाठी आपण सर्वांनी आज शपथ घेऊया. बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबईकरांच्या सेवेमध्ये सातत्याने प्रयत्न करत असते. सर्व मुंबईकरांचे प्रेम महानगरपालिकेला सदैव लाभू देत.



**राष्ट्रपतींचे पुरस्कार जाहीर झालेल्याचा सत्कार**
भारताचे राष्ट्रपती यांच्याकडून, गुणवत्तापूर्वक सेवेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाचे वरिष्ठ केंद्र अधिकारी संतोष रावसाहेब इंगोले, अग्निशामक सुनील सुरेश देसले आणि अग्निशामक योगेश हनमंत कोंडावार यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत. यावेळी भूषण गगराणी यांच्या हस्ते या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुष्पगुच्छ प्रदान करून सत्कार करण्यात आला. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका वार्षिक प्रकाशन २०२५' या पुस्तिकेचेही त्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. महानगरपालिका सचिव खात्याकडून दरवर्षी ही पुस्तिका तयार केली जाते.

## बोरीवलीत आ.संजय उपाध्याय यांची ट्रम्प यांनी लावलेल्या टॅरिफचे प्रतीक असलेली दहीहंडी

### मुख्यमंत्री फडणवीस, मंत्री पीयूष गोयल आणि गोपाळ शेट्टी राहणार उपस्थित

■ मुंबई

भाजपा बोरिवली विधानसभेच्यावतीने आज भव्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मोक्ष प्लाझा समोर, स्वामी विवेकानंद रोड, बोरिवली (प.) येथे दहीहंडी लावण्यात आली आहे.मुंबईतील सर्व गोविंदा पथकांना स्थानिक आमदार संजय उपाध्याय यांनी मनःपूर्वक आमंत्रण दिले आहे सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

यंदाचे विशेष आकर्षण सांगताना आमदार संजय उपाध्याय म्हणाले, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारतावर लावलेल्या टॅरिफचे प्रतीक असलेली खास मटकी बनविण्यायंत आली आहे ती उत्साहात फोडण्यात येणार आहे. प्रत्येक दहीहंडी पथकाचा सन्मान आणि स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे.सकाळी ११ वाजल्यापासून सर्व गोविंदा पथकांसाठी जेवणाची व्यवस्था असेल असेल असेही संजय उपाध्याय यांनी सांगितले.

या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विशेष निमंत्रण देण्यात आले असून, बोरिवलीतील कार्यकर्त्यांनी गोळा केलेला मुख्यमंत्री सहायता निधी यावेळी त्यांना सुपूर्द केला जाणार आहे. यावेळी उत्तर मुंबईचे खासदार, केंद्रीय मंत्री पियुष गोयल आणिमाजी खासदार, गोपाळ शेट्टी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

## 'द यश मंगलम शो' चा नवीन विशेष काव्यमय चित्रपट 'मैं भारत हूं..!'

### स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला मुंबईत लाँच

प्रतिनिधी
■ मुंबई

सर्जनशील उत्कृष्टतेमुळे डिजिटल कंटेंट निर्मितीच्या जगात एक उत्तम ब्रँड बनून सतत लोकप्रियता मिळवणाऱ्या "द यश मंगलम शो" च्या नवीनतम क्रिएशन म्हणून निर्मित "मैं भारत हूं..!" हा विशेष काव्यमय चित्रपट गुरुवार, १४ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला मायानगरी मुंबई येथे लाँच करण्यात आला. देशभक्तीच्या उत्कट भावनेला समर्पित या लघुपटात आपल्या अश्या भारताच्या समृद्ध भूतकाळाचे आणि विविध जागतिक कामगिरीचे सुंदरपणे वर्णन केले गेले आहे, जो गौरवशाली इतिहासापासून गतिमान वर्तमान आणि उज्ज्वल भविष्याकडे आव्हानात्मक मार्गावर सतत वाटचाल करणारा एक गौरवशाली रथ आहे. भारताचा ऐतिहासिक वारसा, तांत्रिक प्रगती, भौगोलिक सौंदर्य, सांस्कृतिक वारसा, त्याच्या शूर सैनिकांचे शौर्य आणि जगात भारताचा वाढता प्रभाव या विशेष चित्रपटात प्रभावीपणे टिपण्यात आला आहे.

लोकप्रिय इंटरनेट माध्यम यूट्यूबवर अलिकडेच प्रदर्शित झालेल्या विविध काव्यात्मक व्हिडिओंच्या सततच्या यशानंतर, हा अद्भुत चित्रपट "वन्स मोर स्टुडिओ, मुंबई" द्वारे "महतपुरकर अँड मंगलम फाउंडेशन" च्या बॅनरखाली "द यश मंगलम शो-२०२५" या यूट्यूब चॅनेलच्या भव्य वाहिनी वर लोकप्रिय "द यश मंगलम शो" चा नवीनतम भाग म्हणून अपलोड करण्यात आला आहे, ज्याचे त्याच्या अद्वितीय सामग्री आणि सादरीकरणाच्या अनोख्या शैलीसाठी व्यापक कौतुक झाले आहे.

## संजय राऊत पूर्णपणे काँग्रेसी विचारधारेने वाटचाल करताहेत!

### भाजप गटनेते आ. प्रविण दरेकरांची खोचक टीका

प्रतिनिधी
■ मुंबई

संजय राऊत हे बेधुंद, आंधळे झालेत. त्यांच्या डोळ्यावर झापड लावली असून त्यांचे तोंड आता सुटलेय. त्यामुळे वाटेल ते आरोप, फेक नरेटिव्ह सेट करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. भाजपा कालही हिंदुत्ववादी भूमिका घेणारा पक्ष होता, आहे आणि उद्याही राहील. हिंदू धर्माचा आम्हाला सार्थ अभिमानच आहे. तुमच्यासारखे काँग्रेसच्या दावणीला विचार आम्ही बांधत नाही. तुम्ही पूर्णपणे काँग्रेसची विचारधारा घेऊन वाटचाल करताय, अशी खोचक टीका भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी राऊतांवर केली.

आज पत्रकारांशी बोलताना आ. दरेकर यांनी उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार शाब्दिक प्रहार केला. राऊत यांच्या आरोपांवर बोलताना दरेकर म्हणाले कि, संजय राऊत हे महात्मा झालेत, त्यांचे विचार महान झालेत. स्वदेशी ही देशासाठी एक चळवळ उभी राहिलेली आहे. परंतु काँग्रेसने ती पुढे नेली नाही. आम्ही स्वाभाविकपणे स्वदेशीचा नारा दिला. कारण स्वदेशीला महत्व आणि ग्लॅमर पंतप्रधान मोदी आणताहेत. इतर देश आपल्याला कशा प्रकारे वेठीस धरताहेत हे आपण पाहतोय. अशा वेळी आत्मनिर्भर भारत झाला पाहिजे, स्वदेशीची मागणी वाढली पाहिजे ही भूमिका पंतप्रधान मोदींनी घेतली असल्याचेही दरेकर म्हणाले. तसेच राऊत यांनी आमच्यावर लक्ष ठेवण्यापेक्षा जनतेच्या प्रश्नावर लक्ष ठेवावे. ते कधीही शेतकरी, कामगार, विकासाबाबत बोलताना दिसत नसल्याचेही दरेकर म्हणाले.



जितेंद्र आव्हाड यांच्या पार्टी आंदोलनावर बोलताना दरेकर म्हणाले कि, आव्हाड हे पार्टीवालेच नेते आहेत. पार्टी करण्यासाठी संधी मिळाली तर ते शोधत असतात. मांस विक्री बंदीचे निर्णय उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही झालेत परंतु विरोधकांना विकासाच्या मुद्द्यावर, जनतेच्या प्रश्नावर बोलायचे नाही. भावनिक वातावरण तयार करून फेक नरेटिव्ह सेट करता येतो का? असा केविलवाणा प्रयत्न सुरु असल्याची खोचक टिकाही दरेकरांनी केली.

**भुजबळ अत्यंत समंजस नेते**
दरेकर म्हणाले कि, छगन भुजबळ हे मोठे नेते आहेत. ते किरकोळ वाद करत नाहीत. वाद केले तर मोठे करतात. छोट्या जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून वाद करतील असे वाटत नाही. नाशिक त्यांची कर्मभूमी आहे. प्रत्येक नेत्याला आपल्या जिल्ह्यात नेतृत्व करावे असा आग्रह असतो. तसा आग्रह असणे चुकीचे नाही. परंतु जेव्हा युतीचे सरकार असते तेव्हा अनेक गोष्टींचे संतुलन मुख्यमंत्री आणि नेतृत्वाला करावे लागते. भुजबळ अत्यंत समंजस नेते आहेत.

**राऊत म्हणजे 'उतावळा नवरा नी गुडघ्याला बाशिंग'**
संजय राऊत यांच्या मनसे आणि उबाठा पक्षाच्या महापालिक निवडणुका एकत्र लढण्याच्या वक्तव्यावर बोलताना दरेकर म्हणाले कि, 'उतावळा नवरा नी गुडघ्याला बाशिंग' अशी स्थिती राऊत यांची झालीय. त्यांना अधिकृत केलेय का? दोन भावंशी चर्चा झालीय का? पक्ष येण्याचे ठरलेय का? कि संजय राऊत हवेत गोळीबार करताहेत. एकत्रित निवडणुका लढणे हा त्यांचा विषय आहे. अजून घोडेमैदान लांब आहे. परंतु संजय राऊत यांना वारंवार थोपवावे लागतेय, खुंटा बळकट करावा लागतोय. म्हणून एकत्र येण्याचा जयघोष ते करताहेत. २० वर्ष त्यांना राज ठाकरे, मनसे आठवली नाही. आता त्यांना ते आठवायला लागलेत. एवढी हतबलता राऊत आणि उबाठा गटाची कधीच झाली नसल्याचेही दरेकर म्हणाले.

## पारंपरिक पद्धतीला फाटा देत वांद्रे येथे उत्तर भारतीय संघाचा आगळा वेगळा स्वातंत्र्य दिन

### शहिदांच्या कुटुंबियांना केली आर्थिक मदत



प्रतिनिधी
■ मुंबई

७९ वा स्वातंत्र्यदिन यंदा बांद्रा पूर्व येथील उत्तर भारतीय संघ भवनात केवळ तिरंगा फडकविण्यापुरता मर्यादित न राहता, त्याला शहीद दिनाचे स्वरूप देत भावपूर्ण व प्रेरणादायी आयोजन करण्यात आले होते. देशाच्या एकता आणि स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या वीर सपूतांच्या कुटुंबीयांचा सत्कार करून त्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचा आर्थिक मदतीचा धनादेश प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात होताच "भारत माता की जय"च्या घोषणांनी आणि देशभक्तीपर गीतांनी संपूर्ण सभागृह दुमदुमून गेले. मंचावरून "ऑपरेशन सिंदूर"चा उल्लेख होऊन उपस्थितांमध्ये जोश आणि अभिमानाची लहर उसळली.

यावेळी बांगलादेश युद्धात शहीद लान्स नायक शांताराम मोरे यांच्या पत्नी उज्वला मोरे पठाणकोट हल्ल्यात शहीद हवालदार सूर्यकांत तेलंगे यांच्या पत्नी मनीषा तेलंगे, कुपवाडा ऑपरेशन रक्षक दरम्यान शहीद कॅप्टन विष्णू गोरे यांच्या माता अनुराधा गोरे,पुलवामा हल्ल्यात शहीद मेजर यशिन रमेश आचार्य यांच्या माता ग्रेस रमेश आचार्य,शहीद अग्निवीर मुरली श्रीराम नाईक यांच्या माता ज्योतीबाई नाईक यांना या कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दहशतवादविरोधी धोरणांचे, साहसी नेतृत्वाचे आणि भारतीय सेनेच्या अदम्य शौर्याचे कौतुक केले. शहीदांच्या शौर्यगाथांचा उल्लेख करत त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

समारंभाचे प्रमुख आयोजक व उत्तर भारतीय संघाचे अध्यक्ष संतोष आर.एन. सिंह म्हणाले,"आजच्या तरुण पिढीला हे समजणे गरजेचे आहे की स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही, ते असंख्य बलिदान आणि साहसाच्या किंमतीवर मिळाले आहे. शहीदांची अमर गाथा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे."

## सीएसटीच्या आवारात मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी केले ध्वजारोहण

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांच्या हस्ते काल ७९व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मध्य रेल्वेचे मुख्यालय, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे ध्वजारोहण करण्यात आले.

सर्व रेल्वे कर्मचाऱ्यांना, त्यांच्या कुटुंबियांना आणि प्रवाश्यांना हार्दिक शुभेच्छा देताना, महाव्यवस्थापकांनी, मध्य रेल्वेसाठी हा अभिमानाचा क्षण आहे, कारण भारतीय रेल्वेने ३ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्युतीकरणाच्या १०० वर्षांचा ऐतिहासिक टप्पा साजरा केला, जो मध्य रेल्वेच्या नावीन्यपूर्ण आणि सेवा उत्कृष्टतेतील सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे प्रतिक आहे.



मध्य रेल्वेच्या कामगिरीविषयी बोलताना श्री मीना अभिमानाने म्हणाले की, संपूर्ण क्षेत्रातील (Zone) मार्ग 'कवच' संरक्षणाखाली आणण्यासाठी स्वयंचलित रेल्वे संरक्षण ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन (एटीपी) कामे मंजूर करणारा भारतीय रेल्वेतील मध्य रेल्वे हा पहिला झोन आहे. तसेच, 'सर्वोत्तम शेड होमिंग कोचिंग लोको' व 'लोको कॅब बदल मॉडिफिकेशन' या श्रेणीत द्वितीय क्रमांक आणि 'सर्वोत्तम शेड होमिंग पारंपरिक लोको' या श्रेणीत तृतीय क्रमांक मिळविण्याचा मध्य रेल्वेला अभिमान आहे.

ते म्हणाले की, मध्य रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी रेल्वे डब्यांमध्ये आणि उपनगरीय गाड्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून अनेक पावले उचलली आहेत आणि उपनगरीय गाड्यांमधील ईएमयू रॅकच्या सर्व महिला डब्यांमध्ये टॉक बॅक सिस्टम बसवण्यात आली आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते, ऑपरेशन अमानत, मेरी सहेली इत्यादी माध्यमातून आरपीएफ कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामगिरीचे त्यांनी कौतुक केले.

## श्वानांवर होणाऱ्या अन्याया विरोधात कॅण्डल मार्चचे आयोजन

### शेल्टर नको,पालिकेने लसीकरण, निर्बीजिकरण अधिक गतिमान करावे, श्वान प्रेमीची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

सद्या मुंबईत भटक्या कुत्रांचा विषय चव्हाट्यावर आला आहे. अधून मधून कुत्राने चावा घेतलेल्या घटना घडतात. राजधानी दिल्लीत एनसीआरमधील सर्व भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थानांमध्ये स्थलांतरित करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. यामुळे मुंबईतील प्राणी कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित करण्याची जबाबदारी हि त्या विभागातील पालिकेची आहे. असा युक्तिवाद प्राणी मित्रांनी केला आहे. कार्यकर्त्यांनी यावर भर दिला की स्थलांतर नाही तर नसबंदी हा मानवीय आणि शाश्वत उपाय आहे. पीएएल फाउंडेशनचे पशु हक्क सल्लागार रोशन पाठक म्हणाले, "प्रत्येक महानगरपालिका त्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी नसबंदीचे योग्य व्यवस्थापन करत नाही तोपर्यंत सर्व कुत्र्यांना आश्रयस्थानांमध्ये ठेवणे शक्य होणार नाही.श्वानांच्या निर्बीजीकरणाचीं गती कमी असल्याने निवारा केंद्रांतील श्वानांची संख्या वाढेल." लसीकरण आणि नसबंदीसाठी



सरकारने दिलेला पैसा जातो कुठे, याची शहानिशा करावी "महानगरपालिकांनी योग्य काळजी घ्यावी. प्रभावी नसबंदीचा आणि लसीकरणाचा अभावा मुळेच प्राण्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. कुत्र्यांच्या हितासाठी, त्यांच्यावर होणाऱ्या अन्याया ला न्याय मिळावा यासाठी 17 ऑगस्ट रोजी अंधेरी येथे कॅण्डल मार्च काढणार आहोत. या विषयी मुंबईतील वनस्पती आणि प्राणी कल्याण संस्थेचे सचिव सुनीश सुब्रमण्यम म्हणाले, "सर्व भटक्या कुत्र्यांसाठी निवारा गृहे उभारणे मुंबईतही व्यावहारिक नाही. वॉर्ड स्तरावर निर्जंतुकीकरण युनिट्स स्थापन करणे हा सर्वोत्तम उपाय आहे. महानगरपालिकांनी जलदगतीने कारवाई केली, तर ही समस्या प्रभावीपणे सोडवता येईल.

**नसबंदीमुळे भटक्या कुत्र्यांची संख्या स्थिर -** डॉ. कलापाशा पठाण
डॉ. कलापाशा पठाण, पशुवैद्यकीय आरोग्य विभाग आणि देवनार वधगृहाचे महाव्यवस्थापक म्हणाले कि, "नसबंदीवर आमचे लक्ष भटक्या कुत्र्यांची संख्या स्थिर करण्यास मदत झाली आहे. "२०१४ मध्ये ही संख्या ९५,००० होती, जी आता ९०,००० पर्यंत खाली आली आहे. कुत्र्यांच्या वर्तनाबद्दल जनजागृती, सामूहिक रेबीज लसीकरण मोहीम आणि पाळीव प्राण्यांचे परवाना दिले जात आहेत.

## स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आणि स्वातंत्र्यदिनीही पावसाची सलामी

प्रतिनिधी
■ मुंबई

१५ ऑगस्ट या देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पावसाने गुरुवारी सकाळी आणि रात्रीही सलामी दिली. त्यामुळे बेसावध आणि घरातून निघताना छत्री सोबत न घेणाऱ्या मुंबईकरांची चांगलीच तारांबळ उडाली.

पावसामुळे अडकलेल्या नागरिकांनी रेल्वे स्थानकात, दुकान, हॉटेल, चहाच्या टपरीच्या ठिकाणी तात्पुरता आसरा घेतला. मात्र पावसाची रिपरिप थांबताच त्यांनी मिळेल त्या वाहनाने तर कोणी झपझप पावले टाकत कसेतरी घर गाठले आणि सुटकेचा निःश्वास सोडला.

आगामी २४ तासांत आकाश ढगाळ राहिल. शहर व उपनगरे येथील काही ठिकाणी मध्यम तर काही ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली होती. त्याप्रमाणे काल स्वातंत्र्यदिनी ही संपूर्ण दिवस पावसाची रिपरिप सुरू होती. अनेक ठिकाणी सकाळी पावसाच्या सोबतीनेच लोकांना झेंडा वादनाचा कार्यक्रम करावा लागला. दरम्यान, शुक्रवारी दुपारी ३.४४ वाजता समुद्रात भरती होती समुद्रात ३.९९ मिटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली होती.

मुंबईत गेल्या वर्षी जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलै महिन्यात चांगलाच मुसळधार पाऊस पडला होता. त्यामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातपैकी चार तलाव तर २१ ते २५ जुलै या कालावधीत भरून वाहू लागले होते. मात्र यंदा मे महिन्यातच पावसाने हजेरी लावली. जून महिन्यात थोडाफार पाऊस पडला. तर जुलै महिन्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी पाऊस पडला. मात्र पावसाच्या संततधारेने मोडक सागर ९ जुलै रोजी तर तानसा तलाव २३ जुलै रोजी भरून वाहू लागला. त्यामुळे मुंबईकरांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. मात्र अपेक्षित पाऊस न पडल्याने अजूनही १०० टक्के तलाव भरले नाहीत. मुंबईकर आणि महापालिका अभियंते मुसळधार पावसाची चातकासारखी वाट पाहत आहेत. अद्यापही पावसाचा दीड महिना शिल्लक आहे. जर या कालावधीत चांगला पाऊस पडला तरच तलावातील पाणीसाठ्यात चांगली वाढ होईल आणि उर्वरित तलाव भरून वाहू लागतील. त्यामुळे मुंबईकरांना वर्षभर पाणी कपातीच्या टांगत्या तलवारीपासून थोडाफार दिलासा मिळेल.

मुंबईला वर्षभरासाठी सात तलावात मिळून १४,४७,३६३ दशलक्ष लिटर इतक्या पाणीसाठ्याची आवश्यकता असते. आज साडेबारा लाख दशलक्ष लिटर.पाणी साठा जमा झाला आहे. त्यामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावात चांगला पाऊस पडणे महत्वाचे आहे.

दरम्यान, स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व सांधेलाल गुरुवारी सकाळी मुंबईतील उपनगरे भागात बऱ्यापैकी पाऊस पडला. त्यानंतर पावसाने काहीशी विश्रांती घेतली. मात्र रात्रीच्या सुमारास पावसाने थोडीफार चांगली बरसात केली. पावसासोबत काहीसा वारा आणि त्यामुळे वातावरणात काहीसा गारवा मुंबईकरांना जाणवला. मात्र एक तास पावसाने संततधारेने चांगली बरसात केली. त्यामुळे मुंबईकर काहीसे सुखावले होते. काल ही तीच परिस्थिती होती.

तुम्ही या जगात राहत नाहीत.
तुम्ही या जगातून प्रवास करत
आहात, हे लक्षात ठेवा.



- रुमी
पर्शियन कवी

वृत्तमानस
मुंबई, शनिवार, १६ ऑगस्ट २०२५

# स्वातंत्र्याचा सार तळागाळात पोहचलाय का?

भारताला स्वातंत्र्य मिळून आज ७९ वर्ष झालीत. स्वातंत्र्य दिनी पंत प्रधान नरेंद्र मोदी यांनी 12 व्यांदा लाल किल्ल्यावरून तिरंगा फडकावला. देश वासियांना संबोधित केले. ब्रिटिशांनी १५० वर्षे राज्य केल्यानंतर आपणाला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले. स्वराज्य म्हटले की, मराठी माणसांच्या पुढे दोन संकल्पना उभ्या राहतात. पहिली संकल्पना म्हणजे शिवरायांचे हिंदवी स्वराज्य. इस्लामी आक्रमकांच्या परकीय राजवटीपासून मुक्ती मिळवून देत, संपूर्ण हिंदुस्थानातील प्रजेस परदास्यातून मुक्त करू पाहणारे, हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा या ध्येयाने चालणारे स्वराज्य. तर दुसरी संकल्पना म्हणजे, स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच अशी ब्रिटिश सरकारपुढे गर्जना करणाऱ्या लोकमान्य टिळकांची. शिवरायांनी त्यांचे स्वराज्य स्थापनेचे कार्य आरंभले, साधारण सतराव्या शतकाच्या मध्यात आणि टिळकांनी संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली, विसाव्या शतकाच्या सुरुवातीस. म्हणजे या दोन्हीतच साधारण २५० वर्षांचे अंतर आहे आणि त्यानंतर स्वातंत्र्य प्रत्यक्षात मिळाले अजून तीन-चार दशकांनी. या कालखंडात स्वराज्य या संकल्पनेचा नेमका कसा विकास होत गेला? हे समजून घेणे आवश्यक आहे. राष्ट्र-राज्य संकल्पनेच्या आधारावर राष्ट्र या संकल्पनेसाठी भारताचे वेगळेपण काय? हे पाहिल्यानंतर, भारतीय मानसातील राज्य संकल्पना पाहणेसुद्धा क्रमप्राप्त आहे. भारत हे एक प्राचीन राष्ट्र आहे आणि खरे स्वराज्य तेव्हाच म्हणता येईल, जेव्हा भारतीय समाजव्यवहार भारतीय संकल्पनांच्या अनुसार नियमित होईल. असा भारतीय समाज पाश्चात्यांचे अंधानुकरण टाळून, भारतीय चिंतनाशी सुसंगत असे भाग स्वीकारेल. राजकीय स्वराज्य हा या विचारधारेनुसार केवळ एक टप्पा असून, संपूर्ण स्वराज्याची प्राप्ती ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ज्या समाजाचे नेतृत्व आंबेडकर करत होते, त्यातील कित्येकांना त्याकाळी सर्वसामान्य भौतिक सुविधा प्राप्त होत नव्हत्या. त्यामुळे आपल्या आवश्यकतांची क्रमवारी लावणे त्यांना भाग होते. त्यामुळे आंबेडकरांनी जरी, सावरकर करत असलेल्या कार्यास पाठिंबाच दर्शवला असला आणि शक्य तिथे, परस्पर साहाय्याने कार्याची प्रगती साधली असली, तरी त्यांचे स्वराज्य हे सामाजिक विषमतेच्या मुळावर घाव घालून, समतेच्या पायावर उभे राहणारे होते. एका दृष्टीने टिळक आणि आगरकर यांच्यातील मतभेदांचे हे पुढील स्वरूप होते. स्वराज्य संकल्पनेत इथे भिन्नता नसून, ते मिळवण्याच्या आणि मिळाल्यावर राबवण्याच्या मार्गातील प्राधान्याच्या विषयांवर केवळ मतभेद होता. म्हणजेच या दोन्ही मार्गांचा भेद हा सैद्धांतिक नसून, केवळ व्यावहारिक स्वरूपाचा होता. त्यामुळे तात्त्विकदृष्ट्या त्यांना विचाराची दोन रूपे म्हटली पाहिजे. भारतीय संस्कृतीत मूळ धरलेला स्वातंत्र्यापूर्वीचा स्वराज्य विचार, स्वातंत्र्यानंतर मात्र विभिन्न धारांनी पुढे जातो. त्यात दोन प्रमुख विचारधारा पाहायला हव्या. पहिली म्हणजे, नेहरूप्रणित काँग्रेसने अंगीकारलेली समाजवादावर आधारित स्वराज्य संकल्पना आणि दुसरी म्हणजे हिंदुत्वावर आधारित स्वराज्य संकल्पना. काँग्रेसच्या नेत्यांची स्वराज्य संकल्पना, साम्यवादी आणि समाजवादी अंगाने जाणारी होती. भारतीय संस्कृतीच्या तत्त्वांशी पूर्णपणे फारकत घेऊन, नवीन जगाच्या पाठी धावणारी ही संकल्पना एक प्रकारे टिळक आणि गांधी या दोघांशी पूर्णपणे विसंगत होती. भारत हे १९४७साली नवीनच निर्माण झालेले राष्ट्र आहे आणि आपण त्याचे निर्माते आहोत, असा काहीसा भाव या विचारधारेचा होता. शिवरायांनी स्थापन केलेले आणि नंतरच्या पेशवाई काळात भारताच्या बहुतांश भूभागावर पसरलेले, हिंदवी स्वराज्य हे प्रामुख्याने राजकीय स्वरूपाचे होते. राजेशाही व्यतिरिक्त राज्यशासनाचे इतर काही प्रकार असतात, हे भारतीय समाज व्यवहारात फारसे माहीतच नव्हते. उद्योग, दळणवळण, शिक्षण यांसारखे समाजव्यवहारातील कित्येक आयाम हे स्वतंत्र पायावर उभे होते. त्यामुळे स्वराज्य म्हणजे, आपल्या राजाने आपल्यावर राज्य करणे इतका मर्यादित अर्थ होता. भारतीय दृष्टिकोनातून नियमनाचे काम धर्मपालनात अभिप्रेत होते आणि राजाने धर्माने चालणे म्हणजेच लोकांना उत्तरदायी असणे हेच स्वाभाविक होते. आज इतक्या वर्षांनी देशाची स्थिती पाहिली तर लक्षात येते की सध्या भारत वेगाने प्रगती करत आहे, विशेषतः अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञान क्षेत्रात. भारताची अर्थव्यवस्था जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. गेल्या दहा वर्षांतली ही कामगिरी केवळ क्रमवारीतील उन्नतीविषयी नाही, तर जागतिक व्यवस्थेत भारताची भूमिका पुन्हा स्पष्ट करण्याबद्दल आहे. इतिहासावर जर नजर टाकली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वराज्य हवे परंतू खरे स्वातंत्र्य म्हणजे देशातील नागरिक स्वतंत्र झाले पाहिजेत अशी मागणी केली होती. प्रत्येक व्यक्तीला समाजात मान वर करून ताठ बाण्याने जगण्याचा अधिकार नसेल तर त्यांच्यासाठी देशाचे स्वातंत्र्य काही कामाचे नाही. सत्तेत पिडीतांना दलितांना मागास जातींना देखील संधी मिळायला हवी असे त्यांचे म्हणणे होते. हिंदू धर्मातील जाती व्यवस्था संपल्याशिवाय समाजात दलितांना योग्य सन्मान मिळणार नाही. त्यामुळे सत्तेत दलितांना योग्य तो वाटा मिळायलाच हवा असे त्यांचे म्हणणे होते. आजही तो मिळतो का याचा विचार होणे आवश्यक आहे. ही समस्या केवळ एवढ्यावरच थांबत नाही, तर श्रीमंत आणि गरीब, शहरी आणि ग्रामीण भाग, विकसित आणि अविकसित भाग, कुशल कामगार आणि अकुशल कामगार यातील दरी मात्र वाढली आहे हे नाकारून चालणार नाही. यातून नवी विषमता जन्माला आली आहे. त्यामुळे अनेक सामाजिक प्रश्नही निर्माण झाले आहेत. चिंतेची बाब म्हणजे भारतातील शेती विकासाचा दर अत्यंत कमी आहे. अद्यापही दोन तृतीअंश भारतीय शेतीवर अवलंबून आहेत. पण शेतीतून मिळणारे उत्पादन आणि उत्पन्न अत्यंत कमी आहे. आर्थिकदृष्ट्या न परवडणारी आहे. अनेक ठिकाणी ती पारंपरिक रितीने केली जाते. शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या योजनाही जुन्याच आहेत. शेतमाल बाजारपेठेत नेण्याची योग्य वाहतूक व्यवस्था नाही. मार्केटपर्यंत जायला रस्ते नाहीत. शेतकरी बाजारही नियमांच्या कचाट्यात आणि मक्तेदारीच्या जाळ्यात अडकले आहेत. याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही. सेवा क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध होत असताना दुसरीकडे बेरोजगारांचा आकडाही वाढत आहे. त्यातही अकुशल कामगारांना हा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावतो आहे. उत्पन्न वाढल्यामुळे आता नागरिक मुख्य सुविधांचा दर्जा वाढविण्याची मागणी वाढत आहे. पाणीपुरवठा, शिक्षण, स्वच्छता, रस्ते, सार्वजनिक आरोग्य या क्षेत्रांकडे लक्ष देण्याची गरज आहे. शिक्षण आता गावागावात मिळू लागले आहे. मात्र, त्यातून अपेक्षित ज्ञान विद्यार्थ्यांना मिळत नाही. त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. भारताच्या जन्मदरात दोन टक्के घट झाली असली तरी लग्नानंतर मुलींच्या मृत्यूच्या दरात मात्र थोडी वाढ झाली आहे. बालमृत्यूचे प्रमाणघडले असले तरी कुपोषणामुळे होणारे मृत्यू थांबले नाहीत. पायाभूत सुविधांमध्ये वीज, रस्ते, वाहतूक आणि बंदरे यांची मोठी गरज आहे. आज आपण जे बीज पेरतो त्यावरून भविष्यात मिळणारी फळे निश्चित होतील. स्वातंत्र्याची बीजे पेरून या देशाला गुलामीतून बाहेर काढून आपल्याला स्वातंत्र्याची फळे चाखायला दिली आहेत. ही फळे चाखत असतानाच पुढच्या पिढीलाही ती चाखायला मिळतील असे वागणे गरजेचे आहे. स्वातंत्र्याचा सार तळागाळात पोहचायला हवा. हा सार पोहचवणे या पिढीची जबाबदारी आहे.

# न्यायाच्या कोल्हापूर पर्वाला 17 ऑगस्टपासून सुरुवात

**कोल्हापूरच्या न्यायिक इतिहासात १७ ऑगस्ट २०२५ हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणार आहे. या दिवशी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर येथील सर्किट बेंचचे उद्घाटन होत असून, सहा जिल्ह्यांसाठी न्यायदानाची एक नवी सोय उपलब्ध होणार आहे. भारताचे सरन्यायाधीश व महाराष्ट्राचे सुपुत्र माननीय न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांच्या शुभहस्ते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या बेंचचा शुभारंभ होणार असून, हा सोहळा न्यायदानाच्या विकेंद्रीकरणातील एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. यानिमित्ताने कोल्हापूर नगरी या ऐतिहासिक घटनाक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी उत्सुक आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासनाने यासाठी जय्यत तयारी केली असून १७ ऑगस्टला होणाऱ्या या सोहळ्याची सर्व स्तरातील जनतेला प्रतीक्षा आहे.**



## ५० वर्षांच्या लढ्याचे यश

कोल्हापूरसाठी सर्किट बेंचची मागणी मागील पाच दशकांपासून सुरू होती. विविध वकील संघटनांनी, सामाजिक संघटनांनी, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी, माध्यमांनी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी या मागणीसाठी सातत्याने प्रयत्न केले. २०१४ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही ही मागणी कायम ठेवली. त्यांच्या कार्यकाळात ही मागणी पूर्ण होत असल्याने विशेष आनंद त्यांनी व्यक्त केला आहे. ते उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या विद्यमान नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि गोवा खंडपीठासोबत आता कोल्हापूरचे सर्किट बेंच न्यायव्यवस्थेत नवे स्थान घेणार आहे.

## उद्घाटन सोहळा, मान्यवरांची उपस्थिती

१७ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता सी.पी. आर.हॉस्पिटल समोरील जुन्या न्यायालय इमारतीमध्ये या सर्किट बेंचचे उद्घाटन होणार आहे. हा सोहळा भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांच्या शुभहस्ते होईल.यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक अराधे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री व कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ तसेच न्यायमूर्ती मकरंद कर्णिक आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## सहा जिल्ह्यांना लाभ

या सर्किट बेंचचा लाभ कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना होणार आहे. याआधी या जिल्ह्यांतील नागरिकांना आपली प्रकरणे मुंबईत लढावी लागत होती, ज्यासाठी वेळ, पैसा आणि श्रम यांचा मोठा खर्च होत असे. आता मात्र ही प्रकरणे कोल्हापुरातच चालवली जाणार असल्याने सर्वांसाठी मोठी सोय होणार आहे. सोलापूर वगळता इतर जिल्ह्यांना तीन-चार तासांत कोल्हापूर गाठता येते, तर सोलापूरलाही साधारण पाच तासांचा प्रवास करून कोल्हापुरात पोहोचता येईल.

## सर्किट बेंच आणि खंडपीठ – काय फरक?

सर्किट बेंच म्हणजे न्यायालयाचे एक तात्पुरते ठिकाण, जेथे उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती ठरावीक कालावधीत येऊन प्रकरणे चालवतात. याची स्थापना करण्याचा अधिकार राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांना असतो आणि त्याचे नोटिफिकेशन राज्यपाल प्रसिद्ध करतात. खंडपीठ मात्र कायमस्वरूपी स्वरूपाचे असते. यासाठी घटनात्मक प्रक्रिया आवश्यक असून, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती प्रस्ताव तयार करून सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवतात. त्यास मंजुरी मिळाल्यावर राष्ट्रपती नोटिफिकेशन काढतात. दोन्ही ठिकाणी न्यायदानाची पद्धत आणि प्रक्रिया सारखीच असते. मात्र सर्किट बेंचमध्ये न्यायमूर्तींची नियुक्ती तात्पुरती असते, तर खंडपीठात ती कायमस्वरूपी असते. कोल्हापूरचे सध्याचे सर्किट बेंचही भविष्यात खंडपीठात रूपांतरित होण्याची शक्यता आहे.

## न्यायदानाची कार्यपद्धती

या सर्किट बेंचमध्ये नागरी, फौजदारी, कामगार, मालमत्ता, सार्वजनिक हक्क अशा विविध प्रकारचे खटले चालणार आहेत. मात्र कंपनी ॲक्ट, करसंबंधी प्रकरणे आणि एनआयए न्यायालयाशी संबंधित खटले मुंबईतील मुख्य न्यायालयातच चालतील. मुंबई, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील न्यायमूर्ती तात्पुरत्या स्वरूपात कोल्हापूर येथे नियुक्त होऊन प्रकरणे चालवतील.

## कोल्हापूर– न्यायदानासाठी आदर्श केंद्र

कोल्हापूर हे ऐतिहासिक, सांस्कृतिक वारशाचे केंद्र असून, येथे उत्तम लॉजिस्टिक सुविधा, हॉटेल्स, धर्मशाळा, शासकीय विश्रामगृहे यांचा उत्तम ताळमेळ आहे. त्यामुळे वकिलांना, पक्षकारांना आणि साक्षीदारांना मुक्काम व प्रवास सोयीस्कर होणार आहे. शिवाय कोल्हापूर हे सहा जिल्ह्यांच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने हे स्थान न्यायदानासाठी आदर्श आहे.

## शेंडा पार्क येथे 25 एकर जमीन राखीव

कोल्हापूर खंडपीठासाठी शेंडा पार्क येथे स्वतंत्रपणे 25 एकर जमीन राखीव ठेवण्यात आली आहे. याशिवाय खंडपीठ इमारत बांधकाम व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूदही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच केली आहे. यामुळे आता या कामालाही गती येणार आहे. एक अद्ययावत इमारत या ठिकाणी येत्या काळात उभी राहणार आहे.

## न्यायदानाची परंपरा

न्याय, नीती, समता, न्यायदान यासाठी कोल्हापूर शहराचे दायित्व मोठे असून या शहराने 1867 पासून न्यायव्यवस्थेला आपलेसे केले आहे. या शहरात पूर्वी 'राजा ऑफ कोल्हापूर ' या सहीने न्यायदान होत होते. महादेव गोविंद रानडे हे कोल्हापूरला पहिले न्यायाधीश होते. ब्रिटिश राजवटीतील काही ऐतिहासिक नोंदीनुसार 1893 मध्ये 'कोल्हापूर स्टेट रूल्स ' म्हणून स्वतंत्र कायद्याचे पुस्तक होते. राजाराम महाराजांच्या काळात 1931 मध्ये कोल्हापुरात स्वतंत्र हायकोर्ट व सुप्रीम कोर्ट स्थापन झाले होते.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या आदर्शाला सलाम

भारतामध्ये न्यायदान भेदाशिवाय, निकोप, समानतेच्या तत्त्वावर असावे हा संदेश राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी दिला होता. कोल्हापूरच्या सर्किट बेंचचा शुभारंभ हा त्यांच्या विचारांना खरी आदरांजली आहे. हे बेंच सुरू झाल्यामुळे न्यायाच्या दारी सर्वसामान्य माणसाला सहज पोहोचता येईल, न्यायासाठी होणारा खर्च आणि वेळ कमी होईल, आणि न्यायदानाची गती वाढेल. 17 ऑगस्टपासून सुरू होणारे हे सर्किट बेंच केवळ न्यायदानाची नवी सुविधा नाही, तर "न्याय विकेंद्रीकरणाचा आणि न्याय सुलभतेचा" एक भक्कम पाया आहे. पन्नास वर्षांच्या अथक प्रयत्नांना मिळालेलं हे यश, कोल्हापूरसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रासाठी न्यायदानाच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरणार आहे.

**- प्रवीण टाके**
**उपसंचालक, कोल्हापूर विभागीय कार्यालय**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई**

# पत्र मानस

## भटक्या कुत्र्यांच्या बाबतीतील आदेशांचे तंतोतंत पालन व्हावे

सुप्रीम कोर्टाने भटक्या कुत्र्यांच्या बाबतीत महत्त्वाचा निर्णय म्हणजेच आदेश दिला आहे. कुत्रा हा एक पाळीव प्राणी असून श्रीमंत तसेच राजकारणी लोकांना कुत्रा पाळण्यांचा कमालीचा छंद असतो. कुत्रा या प्राण्यांचा वावर हा साधारणतः मनुष्यवस्तीतच आढळतो. सुरूवातीला  हवा हवा वाटणारा हा प्राणी आता मात्र उपद्रवी ठरु लागला आहे.  मनुष्याला कुत्रा प्राणी चावण्याचे प्रकार अलीकडच्या काळात कमालीचे वाढले असून त्यातूनच त्यांना रेबीज सारखे गंभीर आजार देखील होत आहे. रेबीज म्हणजे माणूस अक्षरशः कुत्र्या सारखे वागू लागतो म्हणजे जीभ बाहेर काढून लाळ सुटणे,झटके येणे इत्यादी शेवटी माणसाचा मृत्यू अटळ. जीवघेणा चावा घेणाऱ्या भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत जात आहे. भटक्या कुत्र्यांच्या दहशतीची नेमकी दखल घेत माननीय सर्वोच्च न्यायालयाने मानवी जीवांचा बचाव करण्यासाठी सर्व भटक्या कुत्र्यांना निवारगृहात ठेवण्याचा दिलेल्या आदेशांचे सरकारने मात्र तंतोतंत पालन करायला हवे,असे वाटते.

**- श्री संजय गंगाराम साळगांवकर, मुंबई**

## ईव्हीएम मशीनचा पराभव

ईव्हीएमद्वारे झालेल्या निवडणुकीचा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर फेरमतमोजणीतून बदलला गेल्याची ही देशाच्या इतिहासातील पहिली घटना आहे. या निकालाने भारतीय निवडणूक प्रक्रियेतील ईव्हीएम मशीनच्या वापराबाबत संशय आणखी वाढला आहे.आता निवडणूक आयोग या प्रकरणात दोषीचा शोध घेऊन त्यांच्या कारवाई करणार आहेत का? निवडणूक आयोगाने सर्व ईव्हीएम मशीनची फेरमतमोजणी करावी.न्यायालयाने याच ईव्हीएम मशीनमध्ये कोणाताच दोष नसल्याचा निकाल दिलेला आहे.ईव्हीएम मशीनसह विविपॅडचा  वापर केला तरीही निवडणूक आयोगाची विश्वासार्हता कमी झाली आहे. ईव्हीएमचा अवलंब केल्याने त्यांच्या सुरक्षिततेबद्दल आणि हॅकिंग किंवा फेरफार करण्याच्या शक्यतांबद्दल चिंता निर्माण झाली आहे. निवडणूक प्रक्रियेची अखंडता राखण्यासाठी मजबूत सुरक्षा उपाय सुनिश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**- विवेक तवटे , कळवा  ,ठाणे**

## दहीकाल्याची बोधप्रद संकल्पना !

श्रीकृष्णाने व्रजमंडळात गायी चारतांना स्वतःची आणि सवंगड्यांच्या शिदोऱ्या एकत्र करून खाद्यपदार्थांचा काला केला आणि सर्वांसह ग्रहण केला. या कथेला अनुसरून पुढे श्रीकृष्ण जयंतीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी काला करण्याची आणि दहीहंडी फोडण्याची प्रथा पडली.कालपरत्वे या प्रथेचे व्यावसायिकरण झाले आणि ठिकठिकाणी लाखांची बक्षिसे मिळवून देणाऱ्या हंड्या बांधल्या जाऊ लागल्या. पुढे हंड्या राहिल्या बाजूला आणि केवळ मनोऱ्यांचीच स्पर्धा सुरु झाली. जेव्हढे थर जास्त तेव्हढी थर  लावणाऱ्या गोविंदा पथकांना मिळणारी रक्कम जास्त. हळूहळू त्यामध्येही चढाओढ होऊ लागली आणि या धार्मिक उत्सवाचे पुरते बाजारीकरण झाले. श्रीकृष्णाने आपल्या सवंगड्यासह आपलीही शिदोरी एकत्र करून सारे भेद नष्ट करून एकत्र येण्याचा मोलाचा संदेश दिला आहे. आज हिंदू धर्मामध्ये जातीपातीच्या नावाखाली, राजकीय पक्षभेदामुळे आणि वैचारिक फरकांमुळे विविध गट निर्माण झाले आहेत. आज जाहिराती, सिनेमा, वेब सीरिजच्या माध्यमांतून केले जाणारे देव-देवतांचे, महापुरुषांचे, इतिहासाचे विकृतीकरण याचे आपल्याला काहीच वाटत नाही. कोणीही उठते आणि हिंदूंच्या धार्मिक प्रथा परंपरांना अंधश्रद्धा म्हणून हिणवते. पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आपणच आपल्या महान संस्कृतीला विसरून परकीय संस्कृतीला जवळ करू लागलो आहोत. परिणामी आपलीच अपरिमित हानी होत आहे. भगवान श्रीकृष्णाच्या शिकवणीनुसार यंदा आपापसातील सारे मतभेद विसरून राष्ट्राच्या आणि धर्माच्या पुनरुत्थानासाठी एकत्र येण्याचा संकल्प करूया आणि खऱ्या अर्थाने गोपाळकाला साजरा करूया !

- सौ, मोक्षदा घाणेकर, मुंबई

## कृष्णं वंदे जगद्गुरुम्'

श्रीविष्णूच्या पूर्णावतार श्रीकृष्णाने लहानपणापासून आपल्या लीलांनी आणि पुढे आपल्या पराक्रमाने आपले अवतारत्व जगाला दाखवून दिले आहे. आदर्श जीवन कसे असावे याचा वस्तुपाठच त्याच्या एकंदर जीवनचरित्रातून अभ्यासायला मिळतो. रयतेला लुबाडणाऱ्या सख्या मामाचा वध करून त्याने समष्टीच्या कल्याणासाठी नातीगोती विसरण्याचा बोध दिला आहे, तर शिशुपालाचा वध करण्यासाठी त्याचे शंभर अपराध पूर्ण होण्याची वाट पाहताना तुमचे पुण्यसंचय संपले कि कोणतीच शक्ती तुम्हाला वाचवू शकत नाही हे दर्शविताना आपल्या प्रत्येक चांगल्या वाईट कर्माचा हिशोब ठेवला जातो हे त्याने दाखवून दिले आहे. राजसूय यज्ञाच्या वेळी त्याने उष्ट्या पत्रावळ्या उचलल्या.  मैत्रीची नाळ किती घट्ट असावी हे त्याने सुदामाच्या मूठभर पोह्यांच्या बदल्यात आपले सर्वस्व लुटवताना दाखवून दिले. गोप-गोपिकांवर प्रीतीची पाखरण करून, बासरीच्या मंजुळ स्वरांवर साऱ्या सृष्टीला देहभान विसरायला लावून त्याने निरपेक्ष प्रेमाची प्रचिती दिली. नरकासुराचा वध करून त्याने बंदिवासातील १६ हजार स्त्रियांना मुक्त केले एव्हढेच नव्हे, तर त्यांना समाजात मान-सन्मान मिळवून देण्यासाठी स्वतः त्यांच्याशी विवाह केला. रणांगणावर धर्मसंकटात सापडलेल्या अर्जुनाला गीता-उपदेश करताना त्याने तू फक्त निमित्तमात्र आहेस करणारा सर्व मीच आहे हे सांगून त्याने मिथ्य अहंकार न बाळगता सर्व तोच करून घेणार आहे ही आस्था मनी जागृत ठेवण्याचा मोलाचा सल्ला दिला आहे. श्रीकृष्णाच्या या उपदेशपर भग्वदगीतेवर जगातील नामंकित विद्यापीठांमध्ये आज पीएचडी केली जात आहे, अशा एक ना अनेक पैलूंनी सजलेले श्रीकृष्णाचे जीवनचरित्र भारतभूमीला लाभलेली अनमोल देणगी आहे.

**- जगन घाणेकर, मुंबई**

## 'जामतारा' ते श्रीगंगानगर, वाढती सायबर गुन्हेगारी!

विविध प्रसारमाध्यमातून लोकांना सायबर गुन्हेगारीच्या अनुषंगाने जागृत करूनही सायबर गुन्हेगारीला बळी पडणाऱ्यांची संख्या वाढतेच आहे. विशेष म्हणजे देशभरात कुठेही सायबर गुन्हे घडले की त्याची लिंक झारखंड राज्याच्या  'जामतारा' या जिल्ह्यात जाऊन पोहोचते. गेली काही वर्षे  'जामतारा' सायबर फसवणुकीचे केंद्र बनला असून 'फिशिंग राजधानी' म्हणून कुविख्यात झाला आहे. एखाद्याची अवैध मार्गाने युजरनेम, पासवर्ड, क्रेडिट कार्ड डिटेल्स, बँक खात्याचे डिटेल्स यासारखी संवेदनशील माहिती चोरून त्याला ऑनलाईन लुटणाऱ्या सायबर चोरांनी 'जामतारा'चे नाव बदनाम केले आहे. अशाच प्रकारच्या सायबर गुन्हेगारीसाठी अलीकडच्या काही घटनांमुळे राजस्थानातील श्रीगंगानगर जिल्ह्याचे नाव कुप्रसिद्ध होत आहे. या ठिकाणी काही दिवसांपूर्वी बनावट गुंतवणूक योजना, क्रिप्टोकरन्सी घोटाळे आणि बोगस लकी ड्रॉद्वारे देशभरातील हजारो लोकांना फसवून २००० कोटी रुपयांच्या सायबर घोटाळा करणाऱ्या एकाला अटक करण्यात आली. तसेच अलीकडेच चालत्या कारमध्ये बसून सायबर गुन्हे करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली. अशा प्रकारच्या अनेक घटना श्रीगंगानगरमध्ये उघडकीस आल्या आहेत.श्रीगंगानगरमध्ये सायबर गुन्हे करण्यासाठी लागणाऱ्या लिंक तयार करून देणाऱ्या सायबर कॅफेचे पेव फुटले असून तेथील अनेक तरुण यामुळे सायबर गुन्हेगारीकडे वळत आहेत. एकेकाळी बॉक्साईटच्या खाणींसाठी ओळखला जाणारा 'जामतारा' आणि राजस्थानच्या अन्नधान्याचे कोठार म्हणून ओळखला जाणारा श्रीगंगानगर जिल्हा सायबर गुन्हेगारीसाठी ओळखला जावा हे दुर्दैवी म्हणावे लागेल.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे , मुंबई**

## श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त इस्कॉन मंदिरात भाविकांची गर्दी

**ठाणे** – कृष्ण जन्माष्टमी निमित्त शुक्रवारी बाळकुम येथील इस्कॉन मंदिरात सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी झाली. मंदिरातील गाभाऱ्यात फुलांची आरास करण्यात आली असून भाविकांसाठी मंदिर प्रशासनाने विशेष व्यवस्था केली होती. मात्र, दर्शनासाठी ठाणे जिल्ह्यासह बाहेरील भागांतून मोठ्या संख्येने आलेल्या भाविकांमुळे बाळकुम, कापूरबावडी, कोलशेत आणि ढोकाळी परिसरात वाहतूक कोंडी निर्माण झाली. यामुळे कामानिमित्त बाहेर पडलेले नागरिकांना या कोंडीत अडकून राहावे लागले. कोळशेत आणि बाळकुम भागाला जोडणाऱ्या राम मारूती रोड या रस्त्यालगत असलेल्या पिरॅमल वैकुंठ संकुलात मागीलवर्षी इस्कॉन मंदिर उभारण्यात आले आहे. बाळकुम मार्गे कोळशेत, हायलँड भागात जाणाऱ्या वाहन चालक प्रवाशांना हा मार्ग महत्त्वाचा आहे. इस्कॉन मंदिर उभारल्यानंतर दररोज या मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी होऊ लागली आहे. मात्र जन्माष्टमीच्या निमित्ताने भाविकांच्या सकाळपासून लांबच लांब रांगा मंदिराच्या आत आणि बाहेर लागल्या होत्या.



### महत्त्वाचे

## भीमाशंकर मंदिर परिसरात सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**कल्याण :** श्रावणी सोमवार निमित्त सोमवारी कल्याणमधील एक वृध्द महिला आपल्या कुटुंबीयांसमवेत पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील भीमाशंकर येथे शिवशंकराच्या दर्शनासाठी गेली होती. मंदिरासह परिसरात भाविकांची अलोट गर्दी होती. या गर्दीतून दर्शन रांगेतून 'डाकिन्या' शिवशंकराचे दर्शन घेत असताना वृध्द महिलेच्या हातामधील ८० हजार रूपये किमतीची सोन्याची बांगडी चोरीला गेली आहे. भीमाशंकर मंदिर परिसरात आणि मंदिर गर्भगृहात भाविकांची दर्शनासाठी श्रावण महिन्यात झुंबड असते. श्रावणी सोमवार असला की मंदिर परिसर भाविकांनी गजबजून गेलेला असतो. कल्याण पश्चिमेतील खडकपाडा भागातील संदीप हॉटेल परिसरात कुटुंबीयांसह राहणाऱ्या राजाबाई शिवाजी कदम (७५) आपल्या कुटुंबीयांसमवेत सोमवारी (ता.११ ऑगस्ट) श्रावणी सोमवार निमित्त भीमाशंकर येथे शिवशंकराच्या दर्शनासाठी पहाटेच्या वेळेत गेल्या होत्या. कदम कुटुंबीय दर्शन रांगेतून मंदिरात दर्शनासाठी जात होते. भाविक पुढे सरकत होते. त्याप्रमाणे रांग पुढे जात होती. दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान कदम कुटुंबीय मंदिर परिसरात दर्शनासाठी पोहचले. तोपर्यंत गर्दीचा कहर झाला होता. मंदिर गर्भगृहात भागात आल्यानंतर भाविकांच्या दर्शनासाठी उड्या पडत होत्या. राजाबाई कदम (७५) या वृध्दा मंदिरातून दर्शन घेऊन कुटुंबीयांसह बाहेर पडल्या. त्यांच्या हातात सोन्याच्या बांगड्या होत्या. मंदिरातून दर्शन घेऊन बाहेर आल्यानंतर सुस्थितीत झाल्यावर राजाबाई कदम यांना आपल्या डाव्या हातामधील सोन्याची बांगडी गायब असल्याचे आढळले.

## मनसेच्या पाच कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा

**पनवेल :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या चार ते पाच कार्यकर्त्यांनी पनवेल महानगरपालिका असे लिहिलेला आणि नवी मुंबई विमानतळ लिहिलेल्या बोर्डावरील मजकुरावर काळ्या रंगाने स्प्रे मारून बोर्डाचे विद्रुपी करण करून शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. या प्रकरणी पाच जणांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात 13 ऑगस्ट रोजी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला. रोशन रमाकांत माळी हे डी वार्ड पनवेल येथे अधिकारी आहेत. पनवेल महानगरपालिकेने आदई सर्कल, एचडीएफसी सर्कल नवीन पनवेलच्या डिव्हायडरच्या मध्यभागी पनवेल महानगरपालिका आणि त्यावर नवी मुंबई विमानतळ असे लिहिलेले बोर्ड लावलेले आहेत. 13 ऑगस्ट रोजी आदई सर्कल आणि एचडीएफसी सर्कल येथील बोर्डावर मनसेच्या कार्यकर्त्यांनी काळ्या रंगाच्या स्प्रे बॉटलने बोर्डाचे विद्रूपीकरण केले. याची माहिती पालिकेच्या वरिष्ठांना दिल्यानंतर त्यांनी गुन्हा दाखल करण्याची सांगितले. ह्या प्रकरणी पाच मनसेच्या कार्यकर्त्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# कोपरखैरणेत गावठी कट्टा, सहा जिवंत काडतूसे जप्त

## तिघे जेरबंद



प्रतिनिधी
**नवी मुंबई**

नवी मुंबईतील कोपरखैरणे येथे गावठी कट्टा आणि तीन जिवंत काडतूसे बाळगणाऱ्या तीन जणांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई गस्ती पोलिसांच्या सतर्कतेने करण्यात आली आहे. संशयित आरोपींनी एखाद्याची हत्या करण्यासाठी गावठी कट्टा आणला होता की कोणास विक्री करण्यासाठी आणला होता याचा तपास पोलीस करीत आहेत.

सौतमरतन प्रकाश सिंग,( वय २४वर्षे, सेक्टर. १९, कोपरखैरणे, नवी मुंबई, मूळ राहणार. परवेजनगर, जि. बदायु, तहसिल, भिसोली, उत्तरप्रदेश.), पिंटु सोमपाल कुमार, वय २२ वर्षे, धंदा शेती, राहणार सेक्टर १९ कोपरखैरणे, नवी मुंबई, मूळ गाव राजघाट, जिल्हा. बुलंदशहर, उत्तर प्रदेश आणि अभय बॉबी राजपुत, (वय र २४ कोपरखैरणे सेक्टर १९, नवी मुंबई, मूळ राहणार परवेजनगर, जिल्हा बदायु,उत्तरप्रदेश.) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीची नावे आहेत. स्वातंत्र्य दिवसाच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र अधिकची गस्त सुरु आहे.

१४ ऑगस्टला कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे बीट मार्शल पोलीस हवालदार ललित महाजन यांना सेक्टर २३ येथील शांतिदूत महावीर उद्यान, सार्वजनिक स्वच्छता गृह बाजूला, असणाऱ्या पेट कॉर्नरजवळ संशतीतरित्या फिरत आहेत अशी माहिती मिळाली.

याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांना ही माहिती देताच त्यांनी तातडीने पोलीस उपनिरीक्षक उमेश शेडगे, पोलीस हवालदार महाजन, चिकणे, पोलीस शिपाई दोंदे, परदेशी, भांगरे, कानवडे, साळुंखे, आणि यादव हे पथक रवाना केले. सेक्टर २३ व परिसरात शोध घेतला असता तिन्ही संशयित मिळून आले. पोलीस पथकाने त्यांना ताब्यात घेऊन त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे अंगझडतीमध्ये एक गावठी कट्टा आणि सहा जिवंत काडतुसे मिळुन आलेली आहेत. त्याचे मूल्य हे कट्टा ३० हजार तर सहा काडतुसाचे प्रयेकी एक हजार असे सहा हजार तर एकूतण ३६ हजाराचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

बेकायदा शस्त्र बाळगल्या प्रकरणी तिघांनाही अटक करण्यात आले आहे. संशयित आरोपीनी हे बेकायदा शस्त्र कशासाठी कोणासाठी आणले की स्वतः वापर करत होते याबाबत तपास सुरु आहे. अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी दिली.

# ठाण्यातील गणेशोत्सव, नवरात्रोत्सव मंडळांना भाडे माफ; ठाणे महापालिकेचा निर्णय

प्रतिनिधी
**ठाणे**




ठाणे महापालिका क्षेत्रात सार्वजनिक उत्सव मंडळांकडून गणेशोत्सव तसेच नवरात्रौत्सव साजरा करण्यात येतो. या मंडळांकडून उत्सवासाठी शहरातील रस्ते आणि पदपथांवर मंडप उभारण्यात येतो. त्यासाठी ठाणे महापालिका मंडळांकडून मंडप शुल्क घेते. मात्र, करोना काळापासून गणेशोत्सव आणि नवरात्रौत्सवांना मंडप भाडे शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात येत असून ही परंपरा यंदाही पालिकेने कायम ठेवत मंडळांचे मंडप शुल्क माफ केले आहे.

कोरोना टाळेबंदी आणि सततच्या निंबधांमुळे नागरिक आर्थिक संकटात सापडले होते. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक उत्सव साजरे करण्यासाठी नागरिकांकडून सक्तीने वर्गणी गोळा करू नका, असे आदेश राज्य शासनाने दिले होते. यामुळे गणेश मंडळांपुढे मोठा आर्थिक पेच निर्माण झाल्याने त्यांना दिलासा देण्यासाठी गणेश मंडळांच्या मंडपाचे भाडे माफ करण्याचा निर्णय ठाणे महापालिकेने त्यावेळी घेतला होता. करोना काळानंतरही भाडे माफीची परंपरा आजही कायम असल्याचे चित्र आहे. महापालिका क्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना यंदाही संपूर्णत: मंडपभाडे माफी द्यावी, अशी मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे केली होती.

ठाणे महापालिकेकडून मंडप भाडे आकारण्यात येत असल्याचे समजते. गणेशोत्सवाची परंपरा टिकून रहावी यासाठी मंडळानी करोना काळात साधेपणाने गणेशोत्सव साजरा केला. या कालावधीमध्ये त्यांना आर्थिक मदत देखील फारशी मिळालेली नाही. सर्व सार्वजनिक मंडळांच्या माध्यमातून सर्वसामान्य कार्यकर्ते काम करीत असतात. यातूनच भावी पिढी घडण्यास मदत होत आहे. त्यामुळे त्यांना यंदाही संपूर्णत: मंडपभाडे माफी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# पनवेल महापालिका मुख्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण उत्साहात

प्रतिनिधी
**पनवेल**

भारताच्या ७९व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्यावतीने छत्रपती संभाजीराजे मैदानावर आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमास आमदार विक्रांत पाटील, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे,परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, मंगला माळवे, स्वरूप खारगे, सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.भगवान गीते, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, माजी नगरसेवक , विविध पक्षाचे पदाधिकारी , महापालिकेचे अधिकारी आणि सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.




*अंगदान जीवन संजीवनी अभियानांतर्गत अवयव दानासाठी नोंदणी केलेल्या दात्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकने तयार केलेल्या 'कर-मित्र' चॅटबॉट चे लोकार्पण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.*



या कार्यक्रमाच्या वेळी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल आणि महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन करत ध्वजाला मानवंदना दिली. यावेळी वाहन विभागाच्या ड्रायव्हर केबीनचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याचबरोबर पनवेल महानगरपालिकेच्या १० शाळांमध्येही ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी महापालिकेचे शिक्षक, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वदेशीचा नारा अंमलात आणण्याची गरज - भुजबळ



**नवी मुंबई**

एकीकडे पाकिस्तान भारतावर दहशतवादी हल्ले करीत आला आहे ,दुसरीकडे चीन भारतात स्वस्तात वस्तू पाठवून भारतीय अर्थ व्यवस्था धोक्यात आणीत आहे .त्यात आता व्यापारावर एकतर्फी मनमानी निर्बंध लाऊन अमेरिकेने जणू भारतावर व्यापारी हल्ले चढविणे सुरू केले आहे . त्यामुळे या आव्हानात्मक परिस्थितीत सर्व भारतीयांनी एक होऊन परदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकावा आणि स्वदेशी उत्पादकांनी ,स्वदेशात निर्माण केलेल्या वस्तूंचीच खरेदी करून "स्वदेशीचा नारा" प्रत्यक्षात अमलात आणावा, असे परखड आवाहन माध्यमकर्मी देवेंद्र भुजबळ यांनी केले ते नवी मुंबईतील सानपाडा येथील मिलेनियम टॉवर्स सह्याद्री गृहनिर्माण संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

# बदलापूरकरांना पाणी कपातीचा फटका, गढूळ पाण्याचा पुरवठा

प्रतिनिधी
**बदलापूर**



बदलापूरमध्ये माजीप्राकडून आठवड्यातून एक दिवस पाणी कपातीचा निर्णय घेण्यात आला आहे. आणखी बुधवारी देखभाल दुरुस्तीच्या कामाकरिता १२ तासांसाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला. त्याचा फटका दुसऱ्या दिवशी गुरुवार आणि शुक्रवारी बदलापूर पश्चिम परिसरात बहुतेक भागात बसला आहे. बदलापूर पश्चिम परिसरातील नागरिकांना गढूळ पाण्याचा पुरवठा झाला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

बदलापूर शहरामध्ये निवडणुकांचे वातावरण सध्या सुरू आहे. आजी-माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी चढाओढोत व्यस्त आहेत.त्यात नागरिकांच्या समस्याबाबत कोणी बोलण्यास तयार नसल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. मागील काही दिवसांपासून बदलापूर शहरातील नागरिक वीज,पाणी समस्यांशी त्रस्त आहेत. शहरातील सर्वच भागात सातत्याने वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. तसेच पाणी व्यवस्थेवर त्याचा परिणाम झाला आहे.

बदलापूर पश्चिम भागात बुधवारी माजीप्राकडून तातडीची दुरुस्तीची कामे घेण्यात आली. या कामासाठी १२ तास पाणी पुरवठा बंद ठेवण्यात आला. त्यात दुसऱ्या दिवशी बुधवारपासून बदलापूर पश्चिम भागात गढूळ पाणी येत आहे. या गढूळ पाण्याचे काय करायचे ? काय असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. कपडे धुण्यासाठी वापरु शकत नाही. या गढूळ पाण्यामुळे घरगुती वाटर प्युरिफायर यंत्रामध्येही बिघाड होण्याची भीती आहे. तसेच हे गढूळ पाणी घरातील टाक्यांमध्ये साठवले तर गाळ साचण्याची भीती आहे. त्यामुळे दुसरा पर्याय नसल्याने नागरिकांना हेच गढूळ पाणी साठवण्याची वेळ आली आहे. आणखी किती दिवस गढूळ पाण्याचा पुरवठा होणार, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# आरोग्यासोबत हिरवळही ठाणे सिव्हिल रुग्णालय हरितक्रांती

## परिसरात फळझाड आणि स्थानिक झाडांचे रोपण

**ठाणे**



आजच्या धकाधकीच्या आणि प्रदूषणग्रस्त जगात, रुग्णालय हे केवळ उपचाराचे ठिकाण नसून मानसिक आधार देणारे स्थानही आहे. एखाद्या रुग्णासाठी, आजाराशी लढताना डॉक्टरांची औषधे जितकी आवश्यक, तितकीच त्याच्या मनाला आणि आत्म्याला शांत करणारी हिरवाईसुद्धा महत्त्वाची असते. या जाणिवेतून ठाणे सिव्हिल रुग्णालयात एक वेगळा मानसिक थकवा घडवणारा उपक्रम राबवण्यात आला.

सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने रुग्णालयाच्या आवारात फळझाडे आणि स्थानिक वृक्षांची लागवड करण्यात आली. आंबा, जांभूळ, चिकू यांसारखी फळझाडे आणि , वड, पिंपळ, नीम यांसारखे स्थानिक वृक्ष भविष्यात रुग्णालय परिसरात सावली, शुद्ध हवा आणि ताजेतवानेपणाचा श्वास घेऊन येतील.

रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार आणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या उपक्रमात रुग्णालयातील डॉक्टर, नर्स, रुग्णसेवक, तसेच उपचारासाठी आलेले काही रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. रोपे लावताना सर्वांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि डोळ्यात समाधानाची चमक होती.

# RSS जगातील सर्वात मोठी NGO


**पान १ वरुन...**


पंतप्रधान मोदी म्हणाले, 'आज मी तुमच्यासाठी आनंदाची बातमी घेऊन आलो आहे. 15 ऑगस्ट रोजी मी माझ्या देशातील तरुणांसाठी 1 लाख कोटी रुपयांची प्रधानमंत्री विकासित भारत रोजगार योजना सुरू करत आहे. यामुळे ३.५ कोटी तरुणांना रोजगार मिळेल.'

मोदींनी आपल्या भाषणात म्हटले आहे की, यावर्षी दिवाळीत आपल्याला एक मोठी भेट मिळणार आहे. जीएसटी अस्तित्वात येऊन ८ वर्षे झाली आहेत. आम्ही त्याचा आढावा घेतला आहे. आम्ही त्यात सुधारणा करून करप्रणाली सोपी केली आहे. आम्ही पुढील पिढीतील जीएसटी सुधारणा आणत आहोत. आम्ही सामान्य लोकांसाठी कर कमी करू, दैनंदिन वस्तू स्वस्त होतील, लोकांना खूप फायदा होईल. महिन्याभरापूर्वी बातमी आली होती की सामान्य माणसाने वापरत असलेल्या टूथपेस्ट, भांडी, कपडे, शूज इत्यादी वस्तूंच्या किमती कमी होऊ शकतात, कारण सरकार वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) कमी करून मध्यमवर्गीय आणि कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना दिलासा देण्याची तयारी करत आहे.

# दिवा शहरात उभा राहणार छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा

## पुतळ्याच्या निर्मितीसाठी 2 कोटी रुपयांचा निधी मंजूर

**ठाणे**



दिवा शहराच्या पूर्वेला मध्यभागी प्रवेशद्वाराजवळ चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभा रहावा अशी दिवा शहरातील तमाम शिवप्रेमींची जुनी मागणी होती. दिवावसीयांच्या लोकभावनेचा विचार करून तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभा करणार असल्याची घोषणा दोन वर्षापूर्वी केली होती त्यानुसार खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे महाराजांच्या पुतळ्याच्या निर्मितीसाठी 2 कोटीचा निधी नुकताच मंजूर झाला आहे.

खासदार डॉ श्रीकांत शिंदे व शिवसेना दिवा शहरप्रमुख, माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांनी यापूर्वीच त्यासंदर्भात ठराव महापालिकेत प्रशासनाकडून करून घेतला. ठाणे महानगर पालिका यांनी जारी केलेल्या पत्रात ठराव क्रमांक १०० दिनांक २५/०७/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून या कामी सद्यस्थितीत विभागामार्फत शिल्पकाराची निवड करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे म्हटले आहे. शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळयास पर्याप्त निधी उपलब्ध व्हावा व विविध प्रशासकीय मंजुरी मिळवण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे सुद्धा प्रयत्नशील होते असे शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांनी सांगितले आहे.

# गव्हाण गावाच्या पाणीपुरवठा समस्येवर जनआक्रोश मोर्चा

## प्रितम म्हात्रे यांची पोलीस आणि सिडको अधिकाऱ्यांकडे यशस्वी मध्यस्थी

प्रतिनिधी
**पनवेल**




गव्हाण गावाला नियमित व मुबलक पाणी पुरवठा करण्याच्या मागणीसाठी आज गव्हाण ग्रामपंचायत हद्दीत जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण मागणीला अखेर यश मिळाले असून, सिडको प्रशासनाने आजपासून गावाला आवश्यक पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन दिले आहे.

मोर्चादरम्यान, गव्हाण गावासाठी हेटवणे पाणीपुरवठ्यातून स्वतंत्र नवीन पाईपलाईन टाकण्याची मागणीही करण्यात आली. या संदर्भात येत्या ५ ते ६ दिवसांत सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सर्वपक्षीय बैठकीचे नियोजन करण्यात येणार आहे.

नवी मुंबई आणि उलवे नोडच्या जलद विकासाच्या प्रक्रियेत गव्हाण गाव हा त्याचा एक भाग असूनही विविध मूलभूत समस्यांना सामोरे जात आहे. त्यापैकी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस जटिल होत चालला आहे. गावाला दररोज सुमारे 6 लाख लिटर पाण्याची गरज असताना, पाणी कमी दाबाने आणि अपुऱ्या प्रमाणात सोडले जात होते.

मोर्चाची सुरुवात गव्हाण ग्रामपंचायत कार्यालय येथून झाली. या वेळी ग्रामस्थांनी सिडको प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.मोर्चाला भाजप नेते श्री.प्रितम जनार्दन म्हात्रे, माजी सरपंच भाऊशेठ पाटील, माजी उपसरपंच विजय घरत, कोळी समाज नेते विश्वनाथ कोळी, हेमंत ठाकूर, वसंत म्हात्रे, जयवंत देशमुख, देशमुख समाज अध्यक्ष किरण देशमुख, आगरी समाज अध्यक्ष अशोक कडू, योगिता भगत, हेमंत पाटील, ऋषी कोळी, राजू कोळी यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातील महिलांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती.

**तात्पुरता स्थगिती निर्णय**

सिडकोकडून तातडीच्या पाणीपुरवठ्याच्या आश्वासनानंतर आणि पुढील चर्चेची खात्री मिळाल्यानंतर, सदरचा मोर्चा तात्पुरता स्थगित करण्यात आला. ग्रामस्थांनी यावेळी समाधान व्यक्त केले.

**गव्हाण गावासाठी हेटवणे पाणीपुरवठ्यातून स्वतंत्र नवीन पाईपलाईन टाकण्याची मागणी आमच्या ग्रामस्थांची आहे. या संदर्भात लवकरच सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठकीचे नियोजन करण्यात येणार आहे. तोपर्यंत गावाला मुबलक प्रमाणात योग्य त्या दाबाने पाणीपुरवठा सुरळीत होईल असे हमीपत्र आम्हाला सिडको प्रशासनाने दिले आहे.**

**- प्रितम जनार्दन म्हात्रे**
**मा. विरोधी पक्षनेते , पनवेल महानगरपालिका.**

## प्रत्येकाच्या घरोघरी आणि मनोमनी तिरंगा असावा - आ. विक्रांत पाटील

# 'तिरंगा महोत्सव' पनवेल महापालिकेचा स्तुत्य उपक्रम -आ. प्रशांत ठाकूर

प्रतिनिधी
**पनवेल**



प्रत्येक भारतीयाच्या घराघरात आणि मनामनात तिरंगा म्हणजेच आपले राष्ट्रप्रेम असायलाच पाहिजे, असे प्रतिपादन आमदार विक्रांत पाटील यांनी केले तर तिरंगा महोत्सव' हा पनवेल महानगरपालिकेचा महत्त्वपूर्ण असा स्तुत्य उपक्रम असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

पनवेल महानगरपालिकेमार्फत आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी आयोजित तिरंगा महोत्सवाच्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून आमदारद्वय बोलत होते. यावेळी पनवेल परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, तसेच महानगरपालिकेचे सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पुढे मार्गदर्शन करताना आ.श्री. पाटील म्हणाले, युवा वर्गाने अधिक पुढाकार घेऊन घरोघरी तिरंगा- हर घर तिरंगा सारख्या मोहिमेत सहभागी व्हावे.आपला देश,आपले राष्ट्र अधिक भक्कम बनविण्याची जबाबदारी युवा वर्गावर आहे. ऑपरेशन सिंदूर च्या पार्श्वभूमीवर या वर्षीच्या स्वातंत्र्य दिनाला एक आगळे वेगळे महत्त्व आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी यांच्या संकल्पनेतून साकारलेली हर घर तिरंगा ही मोहीम सर्वत्र पोहोचवावी असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## लहान मुलांशी खेळताना वाद; रागाच्या भरात 13 वर्षीय मुलीने घेतला गळफास

**वैजापूर:** तालुक्यातील खिर्डी गाव आज दुपारी एका हृदयद्रावक घटनेने हादरले. पुनम अशोक पवार (वय १३) या अल्पवयीन मुलीने केवळ रागाच्या भरात गळफास घेऊन जीवन संपविल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे तीन वाजता गावातील गल्लीत खेळत असताना पुनमचा काही लहान मुलांशी वाद झाला. त्या वेळी तिच्या घरात कोणीच नसल्याने ती रागाच्या भरात घरी गेली. दरवाजा आतून बंद करून, आजीच्या लुगड्याच्या सहाय्याने गळफास घेऊन तिने आपली जीवनयात्रा संपवली.वडील आणि आजी घरी परतल्यावर त्यांनी ही धक्कादायक घटना पाहिली. तिला तातडीने देवगाव रंगारी प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले, परंतु वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून तिला मृत घोषित केले.



### महत्त्वाचे

## अभिनेते नसिरुद्दीन शहा कणकवलीच्या प्रेमात, व्हिडीओ व्हायरल



**कणकवली :** ज्येष्ठ अभिनेते नसिरुद्दीन शहा व त्यांची पत्नीने एका चॅनलला मुलाखत दिली. या मुलाखतीत मुलाखतकार महिलेने तुम्हाला सर्वांत कोणते ठिकाण आवडते,असा प्रश्न केला असता त्यांनी आपल्या कणकवली हे ठिकाण आवडते असे उत्तर दिले. या मुलाखतीचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला आहे. हा व्हिडिओ बघितल्यानंतर शहा हे कणकवलीच्या प्रेमात असल्याचे दिसून येते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेकांनी हा व्हिडिओ व्हॉटसअप, फेसबुक, इन्स्टाग्राम, स्नॅपचार्ट सहअन्य सोशल मीडिया फ्लॅटफार्मवर स्टेटस् म्हणून लावला आहे. सोशल मिडियावर या व्हिडिओचा दिवसभर बोलबाला असल्याचे चित्र पहावयास मिळाले. मुलाखतकार महिलेने शहा यांच्या पत्नी यांना आपणास कोणते ठिकाण आवडते, असा प्रश्न केला असता त्यांनी आपणास बेंगलोर, चेन्नई ही शहरे आवडतात असे उत्तर दिले. हाच प्रश्न त्या महिलेने नसरुद्दीन शहा यांना केला असता.त्यांनी आपणास 'कणकवली' हे ठिकाण आवडत असल्याचे सांगतानाच वसंतराव आचरेकर प्रतिष्ठानच्या नाट्यगृहात आपण नाटक सादर केले होते. हे नाट्यमंदिर दगडांनी बांधलेले असून त्यावर लोखंडी पत्र्याचे छप्पर आहे, त्यात शामियाना लावलेला आहे, अशी आठवणही सांगितली.

## चांदोलीत दारूबंदी पेटली,'परमिट रूम' विरोधात ग्रामस्थ आक्रमक

**विशाळगड :** दारूबंदीचा ठराव करूनही गावात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या परमिट रूमच्या विरोधात चांदोली ग्रामस्थांनी स्वातंत्र्यदिनीच शाहूवाडी तहसील कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले. हॉटेलच्या नावाखाली सुरू असलेल्या या अवैध धंद्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप असून, प्रशासनाने तात्काळ कारवाई न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.२०१७ साली चांदोली ग्रामसभेने दारूबंदीचा ठराव एकमताने मंजूर केला होता. गावाचे आरोग्यपूर्ण आणि सुरक्षित वातावरण जपण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता.या ऐतिहासिक निर्णयाला पायदळी तुडवत, एका हॉटेलाच्या परवान्याच्या नावाखाली गावात अवैध 'बार' आणि 'परमिट रूम' सुरू करण्यात आली.

## अल्पवयीन मुलीच्या मदतीने बापाच्या घरफोड्या

**कराड :** मागील पाच महिन्यात मलकापूर, कोयना वसाहत, कार्वेनाका परिसरात झालेल्या पाच घरफोड्या उघडकीस आणण्यात कराड शहर पोलिसांना यश मिळाले आहे. विशेष म्हणजे अटक केलेल्या संशयिताने अल्पवयीन मुलीच्या मदतीने चोऱ्या केल्याची धक्कादायक बाब तपासातून समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी चोरीस गेलेले 14 लाख 80 हजारांचे सुमारे 18.5 तोळे सोने हस्तगत केले असून संशयिताचा आणखी काही गुन्ह्यात हात असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. आगाशिवनगर झोपडपट्टी, मलकापूर येथील हा चोरटा आहे. फेब्रुवारी 2025 ते जुलै 2025 या कालावधीत कराड शहरासह परिसरात घरफोड्यांचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे कराड शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेजसह अन्य बाबींवर काम करत संशयिताला ताब्यात घेतले होते. त्याने त्याच्या अल्पवयीन मुलीच्या मदतीने पाच घरफोड्या केल्या असून त्याच्याकडून सुमारे 14 लाख 80 हजारांचे 18.5 तोळे सोने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

# जलसमाधी आंदोलन करायला गेले अन् आंदोलकच गेला वाहून...

प्रतिनिधी
■ बुलढाणा

गावातील समस्या सोडवण्यासाठी गावकऱ्यांनी जलसमाधी आंदोलनाची हाक दिली. आंदोलन करायला पूर्णानदीच्या काठावर गेले. प्रशासनाचे अधिकारी आणि आंदोलक यांच्यात समस्या सोडवण्यासंदर्भात चर्चा सुरू असतानाच एका आंदोलकाने पाणी पातळी वाढलेल्या पूर्णानदी उडी घेतली. आंदोलक सगळ्यांसमोर वाहून गेला. त्यानंतर एकच खळबळ उडाली. त्याच्या शोधासाठी पथके बोलावण्यात आली असून, शोध सुरू आहे.



जिगाव प्रकल्पातील आडोळ खुर्द गावातील ग्रामस्थांना अनेक समस्या भेडसावत असून, त्यांनी याकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला होता. घरांसाठी कमी मोबदला, दोन वर्षात गावठाणात प्लॉट देण्याऐवजी २०२३ मध्ये दिले गेले. २०१६ जी रक्कम मोबादला म्हणून दिली गेली, त्यात घर घेणं शक्य नाही. त्याचबरोबर नवीन गावठाण तयार होत असताना ठेकेदार व सरकारी अधिकारी यांच्या संगनमताने गावठाणातील कामे ही अतिशय निकृष्ट दर्जाची झाली आहेत, असा ग्रामस्थांचा आरोप आहे.

त्यातच नवीन गावठाणाची जागा निश्चित करीत असताना जो रस्ता गृहीत धरून जागा निश्चित केल्या गेली, तोच रस्ता दुसरीकडे हलवण्याचा घाट प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घातला आहे. एकाच प्रकल्पातील इतर गावांना वेगळा न्याय व आडोळ खुर्द गावाला वेगळा न्याय दिल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत असून, याविरोधात जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला गेला होता.

दरम्यान, शुक्रवारी म्हणजे १५ ऑगस्ट रोजी ग्रामस्थांनी कुटुंबातील सदस्यांसह पूर्णा नदी पात्रात जलसमाधी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. सकाळी दहा वाजतापासून ग्रामस्थ येण्यास सुरूवात झाली. आडोळमधील लोक कुटुंबासह आंदोलन स्थळी आले. जलसमाधी आंदोलन सुरू असतानाच स्थानिक ग्रामस्थ आणि प्रकल्प अधिकारी यांच्यात चर्चा व त्यानंतर थोडी बाचाबाची झाली. याच वेळी गौलखेड येथील विनोद पवार या व्यक्तीने प्रशासनाचा निषेध म्हणून थेट पूर्णा नदी पात्रातच उडी मारली. आंदोलनकर्त्याने अचानक नदीत उडी मारल्याने खळबळ माजली. अचानक ही घटना घडली. यावेळी कोणतीही व्यवस्था तिथे केलेली नव्हती. त्यामुळे तो सर्वांसमोरच वाहून गेला. दुपारी तीन वाजेपर्यंत सुद्धा सदर व्यक्ती दिसून न आल्याने प्रशासनाने एनडीआरएफच्या विशेष पथकाला पाचारण करून त्याचा शोध सुरू केला.

प्रशासनाच्या वतीने शोध कार्य सुरू असून, आंदोलकही आक्रमक झाले आहेत. संतापलेल्या आंदोलकांनी एका प्रकल्प अधिकाऱ्याला मारहाणही केल्याचे समजते.

# मोदी, शहा, फडणवीसांचा महाराष्ट्र नामर्द करण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी
■ नाशिक



पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राला नामर्द करण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी केली. हा मर्दांचा महाराष्ट्र होता. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, शाहू - फुले आंबेडकरांचा व बाळासाहेब ठाकरे यांचा महाराष्ट्र होता. या राज्याने सदैव शौर्याची गाथा गायली. पण मागील 10 वर्षांत दिल्लीकडून हा महाराष्ट्र दुर्बल व्हावा, कमजोर व्हावा व षंढ व्हावा असे प्रयत्न होत आहेत, असे ते म्हणालेत.

संजय राऊत आज नाशिक येथे पत्रकारांशी संवाद साधताना वेगवेगळ्या मुद्यांवरून संवाद साधला. त्यात त्यांनी मांस विक्री बंदीच्या मुद्यावरून भाजप व त्याच्या नेतृत्वातीतल सरकारचा खरपूस समाचार घेतला. ते म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचा आणि खाण्या-पिण्यावरील बंधनाचा काही संबंध नाही. ब्रिटिश सोडून गेले, पण त्यांनी आमच्यावर अशी बंधने लादली नाही. आज धार्मिक सण नाही, तर विजयोस्तव आहे. लोकांनी हवे ते खायचे आणि हवे ते प्यायचे असा स्वातंत्र्यदिनाचा सोहळा असला पाहिजे. म्हणूनच भाजपने धार्मिक असलेला हा देश धर्मांध केला असे मी म्हणतो. त्यांनी तालिबानी प्रवृत्तीचा धर्म इथे आचरणात आणण्यासाठी बंधने लादली.

स्वातंत्र्यदिनी मांस खायचे नाही, हा नवा नियम कुणी आणला. हा नियम काँग्रेसने आणल्याचा दावा केला जात आहे. त्यांनी शासकीय कत्तलखाने बंद ठेवण्याचा निर्णय आणला असेल, पण त्यात तुम्ही धर्मांधता आणली. खाणारे खातीलच. ते ऐकणार नाहीत. हा शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे, असेही संजय राऊत यावेळी शासकीय बंदीचा समाचार घेताना म्हणाले.

**ठाकरे बंधू मुंबईसह सर्वच महापालिका ताब्यात घेतील**

संजय राऊत यांनी यावेळी ठाकरे बंधू मुंबईसह सर्वच महापालिका ताब्यात घेणार असल्याचाही दावा केला. ते म्हणाले, राज ठाकरे काहीच चुकीचे बोलले नाहीत. मुंबई महापालिका हे ठाकरे बंधू एकत्र येऊन जिंकणार आहेत. नाशिकमध्ये सुद्धा आम्ही एकत्र लढणार आहोत. ठाणे, कल्याण डोंबिवली आदी अनेक महापालिकांत आम्ही एकत्र लढू. या प्रकरणी आमची चर्चा सुरू आहे. राज व उद्धव ठाकरे यांची ताकद ही मराठी माणसाच्या एकजुटीची ताकद आहे. आता कोणतीही ताकद आली, अघोरी शक्ती आली तरी मराठी माणसाची वज्रमूठ तोडू शकत नाही.

राऊत पुढे म्हणाले, भाजपचे लोक नपुंसक आहेत. त्यांना ते स्वतः नपुंसक असल्याचा भास होतो. महाराष्ट्राला नपुंसक करण्याचे काम सुरूच आहे. त्यात चुकीचे काय आहे? हा मर्दांचा महाराष्ट्र होता. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, शाहू - फुले आंबेडकरांचा व बाळासाहेब ठाकरे यांचा महाराष्ट्र होता. त्याने सदैव शौर्याची गाथा गायिली. पण मागील 10 वर्षांत दिल्लीकडून हा महाराष्ट्र दुर्बल व्हावा, कमजोर व्हावा व षंढ व्हावा असे प्रयत्न होत आहेत, असे संजय राऊत म्हणाले.

# जरांगेंची प्रकृती बिघडली

प्रतिनिधी
■ नांदेड

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती अचानक बिघडली आहे. 29 ऑगस्ट रोजी मुंबईमध्ये काढण्यात येणाऱ्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर सध्या ते नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान त्यांची अचानकपणे प्रकृती खालावली. त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार मनोज जरांगे पाटील सध्या नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. मात्र या दरम्यान त्यांच्या अचानकपणे पोट दुखत होते. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना त्रास होत असल्याचे समजताच डॉक्टरांनी तात्काळ त्यांची तपासणी केली आहे. नांदेडच्या



शास्त्रीय विश्रामनगरात डॉक्टरांकडून त्यांच्यावर उपचार सुरू करण्यात आले आहेत. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे आणि 'सगेसोयरे' अध्यादेश लागू करावा, या प्रमुख मागण्यांसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांचा मोर्चा 29 ऑगस्ट रोजी मुंबईत धडकणार आहे. मनोज जरांगे यांनी समाजबांधवांना या मोर्चामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यासाठीच ते सध्या दौऱ्यावर असून आज त्यांनी नांदेड जिल्ह्यात बैठका घेतल्या.

# संमतीशिवाय काढले महिलेचे फोटो आणि व्हिडिओ

### एकनाथ खडसेंचा जावई प्रांजल खेवलकरच्या अडचणीत वाढ

प्रतिनिधी
■ पुणे

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे जावई व रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. परवानगीशिवाय ,महिलेचे फोटो आणि व्हिडिओ काढल्याप्रकरणी त्यांच्या विरोधात पुण्यातील सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खराडी रेव्ह पार्टी प्रकरणी प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे. त्यात आता आणखी एका नवीन प्रकरणामुळे त्यांचा पाय आणखी खोलात गेला आहे.

या नव्या प्रकरणात, एका महिलेच्या तक्रारीनुसार प्रांजल खेवलकरने तिची संमती न घेता व्हिडिओ आणि फोटो



काढले, असा आरोप केला आहे. या महिलेच्या तक्रारीनुसार, पोलिसांनी आयटी ॲक्ट 665ई आणि बीएनएस कलम 77 अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. यामुळे रेव्ह पार्टी प्रकरणानंतर खेवलकर यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

प्रांजल खेवलकर यांच्यावर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेत गंभीर आरोप केले आहेत. चाकणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार प्रांजल खेवलकर यांच्या मोबाइलमध्ये एका हिडन फोल्डरमध्ये शेकडो अश्लील फोटो आणि व्हिडिओ सापडले होते. तसेच महिला तस्करी झाल्याचा देखील गंभीर आरोप चाकणकर यांनी केला होता. पुण्यात काही दिवसांपूर्वी खराडी येथील एका घरात रेव्ह पार्टी सुरू असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी धाड टाकली असता प्रांजल खेवलकर यांच्यासह त्याचे मित्र व दोन महिलांना ताब्यात घेतले. तसेच यावेळी तिथे दारूसह अमली पदार्थ जसे गांजा व कोकेन देखील सापडले होते. त्यानंतर प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे. आता नवीन प्रकरणामुळे त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

# सहकार विकास पॅनल बेस्ट पतपेढीची निवडणूक लढणार आणि जिंकणार : कामगार नेते नागे

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट कामगारांच्या सर्वांगीण विकासासाठी व सध्या सुरू असलेला मनमानी कारभार संपविण्यासाठी सहकार विकास पॅनल बेस्ट क्रेडिट सोसायटी निवडणुकीच्या रिंगणात उतरला असल्याची माहिती भाजपा बेस्ट कर्मचारी संघाचे अध्यक्ष गणेश हाके आणि सरचिटणीस गजानन नागे यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

दि बेस्ट एम्पलोयीज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची पंचवार्षिक निवडणूक येत्या १८ ऑगस्ट २०२५ रोजी होत आहे. गेली अनेक वर्ष या सोसायटीमध्ये सेना व वर्कर्स युनियनचे प्राबल्य राहत आले आहे.



१५९३ सभासद असलेल्या या क्रेडिट सोसायटीचे अकराशे कोटी रूपयाच्या वर भाग भांडवल असून ठेवीही जवळपास एक हजार कोटीच्या जवळपास आहेत.

बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांना कमी व्याजदराने अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे, गरजेनुसार त्यांना तात्काळ कर्ज मंजूर करणे, दहा लाखापर्यंत मेडिकल साठी विमा उतरवणे. क्रेडिट सोसायटीच्या कारभारात पारदर्शकता आणणे व कर्मचाऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध उपक्रम राबविणे या साठी सहकार विकास पॅनल या पंचवार्षिक निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या सोबत वारंवार बैठक घेऊन बेस्ट कामगारांचा कोविड भत्ता भाजपा बेस्ट कामगार संघाचे अथक प्रयत्नाने आज कामगारांना मिळत आहे त्याचा आम्हाला विशेष अभिमान आहे.

भाजपा बेस्ट कर्मचारी संघ या निवडणुकीत कर्मचाऱ्यांची युनियन म्हणून पुढाकार घेत असला तरी भारतीय जनता पार्टीचा या निवडणुकीशी थेट संबंध नाही हे आम्ही आपणास येथे मुद्दाम अधोरेखित करत आहोत असे सहकार विकास पॅनल चे सरचिटणीस गजानन नागे यांनी सांगितले.

# राज्यात अराजकता पसरवण्यासाठी काही शक्तींचे काम सुरु

■ सांगली

सांगलीचे पालकमंत्री व भाजपचे नेते चंद्रकांत पाटील यांनी सांगलीत स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण सोहळ्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना विरोधकांवर टीका केली आहे. तसेच सध्या अनेक जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्गाला विरोध होत आहे, यावर देखील त्यांनी भाष्य केले आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, सध्या राज्यात काही झाले की सरकारला आणि राज्याला अस्थिर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. एक प्रकारे राज्यात अराजकता पसरवण्याचे काम काही लोक करत आहेत. तशी अराजकता निर्माण व्हावी यासाठी काही शक्ती काम करत आहेत का असा प्रश्न पडतोय, असे विधान पाटील



यांनी केले.शक्तिपीठ महामार्गाला होत असलेल्या विरोधावर प्रश्न विचारला असता चंद्रकांत पाटील म्हणाले, जर कोयना धरण झाले नसते तर आज महाराष्ट्राची वीज निर्मिती आणि शेतीला पाणी हे मिळाले नसते. समृद्धी महामार्ग झाला नसता तर नागपूरहून मुंबईला आठ तासात शेतकऱ्यांचा शेतीमाल पोहोचला असता का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

शक्तिपीठ महामार्ग वेगवेगळ्या प्रकारच्या तीर्थक्षेत्रांना जोडणारा रस्ता आहे. हा महामार्ग होत असताना बाधित शेतकऱ्यांना भरपाई योग्य मिळाली पाहिजे, त्यांचे पुनर्वसन योग्य झाले पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शक्तिपीठला विरोध बंद करावा आणि आपल्याला भरपाई कशी चांगली मिळेल याबाबत विचार करावा, असे आवाहन चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

# दादरमध्ये दहीकाला उत्सवातून कॅन्सरग्रस्तांना मदत

■ मुंबई

कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या मदतीसाठी, मुंबईतील एकमेव दहीहंडी म्हणून ओळखला जाणारा "दहीकाला उत्सव २०२५" यावर्षी दादर येथे उत्साहात पार पडणार आहे. हा सोहळा शनिवार, १६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ७.०० या वेळेत केशव दाते उद्यान, प्रा. आगाशे पथ, भवानी शंकर रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८ येथे आयोजित करण्यात आला आहे.

या सामाजिक आणि सांस्कृतिक सोहळयास अनेक मान्यवर, लोकप्रतिनिधी, समाजसेवक आणि कलाकार उपस्थित राहणार आहेत. आयोजकांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, "चला, आनंदसोहळ्यात सहभागी होऊन एका चांगल्या कार्याला हातभार लावूया!" दहीकाला फोडण्याच्या थरारासह, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक संदेश आणि एकतेचा उत्सव अशा विविध उपक्रमांनी हा दिवस संस्मरणीय ठरणार आहे. गोविंदा पथकासाठी पाच थर ५००/ सहा थर ११११/ देण्यात येणार एकूण बक्षीस २५१००० (दोन लाख एककावन हजार रुपये) ठेवण्यात आले आहे.यामधील उरलेली रक्कम कॅन्सरग्रस्त रुग्णांना देण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे.

# पंकजा मुंडेंचा ताफा अडवला, पोलीस उपअधीक्षकांनी आंदोलकाच्या कमरेत घातली लाथ

प्रतिनिधी
■ जालना

जालना येथे आंदोलन करणाऱ्या एका आंदोलकाने मंत्री पंकजा मुंडे यांचा ताफा अडविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्याला पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले होते. ताब्यात घेतल्यानंतर त्या आंदोलकाला घेऊन जात असताना पोलीस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी यांनी मागून धावत येत त्या आंदोलकाच्या कंबरेत लाथ घातली. या घटनेचा



व्हिडीओ व्हायरल झाला असून पोलीस उपअधीक्षकांवर टीका होत आहे.

पत्नीने परस्पर दुसरे लग्न केल्याच्या वैफल्यातून तसेच पोलिसांकडून कोणतीही मदत मिळत नसल्याने गोपाळ चौधरी या तरुणाने स्वातंत्र्यदिनी आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिला होता. स्वातंत्र्यदिनानिमित्त पालकमंत्री पंकजा मुंडे जालन्यात आल्या होत्या. त्यावेळी गोपाळ चौधरी व त्याच्या कुटुंबियांनी पंकजा मुंडे यांचा ताफा अडविण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यानंतर त्यांनी अंगावर रॉकेल देखील ओतून घेतले. त्यामुळे पोलिसांनी गोपाळ चौधरी व त्याच्या कुटुबियांना ताब्यात घेतले.

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे भारतीय स्वातंत्र्य, एकात्मता अखंड - रामदास आठवले

वृत्तसंस्था
■ लंडन

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे भारत देश एकसंघ आहे.राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्य अखंड आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज केले.देशवासीयांना 79 व्या स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. लंडन मधील हेन्री रोडवरील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय स्मारकाला आज स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी भेट देऊन येथील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास विनम्र अभिवादन केले.

यावेळी ना.रामदास आठवले



यांच्या समवेत सौ सीमाताई आठवले; रिपाइं चे महाराष्ट्र उपाध्यक्ष अविनाश कांबळे; सौ माधुरी अविनाश कांबळे; रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष चंद्रशेखर कांबळे उपस्थित होते. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर आमचे सर्वोच्च प्रेरणास्थान आहेत. त्यांच्यामुळेच माझ्या सारख्या कार्यकर्त्याला केंद्रीय मंत्रिमंडळात पोहोचण्याची संधी मिळाली. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या संघर्षामुळे त्यांनी केलेल्या क्रांतीमुळे त्यांनी दिलेल्या संविधामुळे देशभरातील दलित गरीब बहुजन वर्गाला सामाजिक आर्थिक शैक्षणिक न्याय मिळाला.असे ना. रामदास आठवले म्हणाले.

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर लंडनमधील स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये शिक्षण घेत असताना ते लंडन मधील हेन्री रोडवर रहात असत.त्या निवासस्थानी महाराष्ट्र राज्य सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात 2014 साली डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संग्रहालय रुपी स्मारक उभारले.त्याचे लोकार्पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले.त्या उद्धाटन सोहळयास मी सुद्धा उपस्थित राहिलो होतो याची आठवण ना.रामदास आठवले यांनी सांगितली. लंडन मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक दोन मजली आहे.त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळा आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे अनेक दुर्मिळ फोटो आणि बुद्धमूर्ती या स्मारका मध्ये आहेत. इंग्लंड मधील अनेक लोक तसेच भारतीय पर्यटक या स्मारकाला नेहमी भेट देत असतात अशी माहिती ना. रामदास आठवले यांनी दिली.

# क्रांती दिन आरोंद्यात उत्साहात साजरा

प्रतिनिधी
■ सावंतवाडी

सावंतवाडी तालुक्यातील आरोंदा गावी ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आरोंदा पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आरोंदा हायस्कूल आरोंदाच्यावतीने हुतात्मा स्मारक येथे ९ ऑगस्ट क्रांतीदिनाच्या निमित्ताने शहिदांना अभिवादन करण्यात आले. यावेळी सावंतवाडी तहसीलदार श्रीधर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विचारमंचावर प्रशालेचे प्राचार्य सिद्धार्थ तांबे, संस्था सचिव भाई देऊलकर, खजिनदार रुपेश धर्णे, उपाध्यक्ष गणेश नाईक, रामचंद्र कोरगावकर, हुतात्मा घुर्ये यांचे कुटुंबीय द्वारकानाथ घुर्ये, तलाठी पास्ते, पोलिस पाटील जाधव तसेच प्रशालेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

शालेय विद्यार्थ्यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केली. सार्थक



राऊत, वेदिका पांढरे, सायली पोळी, प्रीतेश वसावे या मनोगते व्यक्त केलेत्यांचा तहसीलदार पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी क्रांतीदिनाचे महत्त्व सांगताना "स्वातंत्र्य म्हणजे काय ?" ही संकल्पना तहसीलदारांनी विद्यार्थ्यांना समजावून दिली व भारतीय स्वातंत्र्यासाठी क्रांतिवीरांनी केलेल्या योगदानाची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली. विद्यार्थ्यांनी शालेय परिसर स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता आणि सार्वजनिक साधनांचा काळजीपूर्वक वापर या गोष्टी जरी केल्या तरी ती राष्ट्रपप्रेमच आहे. राष्ट्र उभारणीसाठी विद्यार्थ्यांनी शालेय पाठ्यपुस्तकांचा उत्तम रीतीने अभ्यास करून यूपीएससी, एमपीएससी परीक्षांच्या माध्यमातून आदर्श अधिकारी होण्याचे स्वप्न पहा, असे प्रतिपदन तहसीलदार पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य सिद्धार्थ तांबे यांनी तर आभार चंदन गोसावी यांनी मानले. अतिशय उत्साहात क्रांती दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

मुंबई: देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त घाटकोपर पूर्व पंतनगर येथे शाखा क्रमांक 131च्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने स्वातंत्र्य दिन मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला त्याप्रसंगी विभाग प्रमुख सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई क्रिकेट असोसिएशन अंडर19 गर्ल संघात कुमारी निवेदिता सायली राकेश जयपाल हिची निवड करण्यात आली.त्या निमित्ताने तिचा शाखेच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन सत्कार करताना उपविभाग प्रमुख अजित गुजर,घाटकोपर पूर्व विधानसभा कार्यालय प्रमुख प्रकाश वाणी, शाखा प्रमुख विशाल चावक, अशोक वंडेकर, प्रसाद कामतेकर , शांताराम निकम, राजेश खरात, सतीश सोनार, अरुण चव्हाण व इतर पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते



# बीओबी बुध्दिबळ स्पर्धेत मानस, दीप, स्वरूपची विजयी सलामी




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे बँक ऑफ बडोदा पुरस्कृत स्वातंत्र्य दिनी सुरु झालेल्या बीओबी ट्रॉफी शालेय बुध्दिबळ स्पर्धेत फिडे गुणांकित सबज्युनियर बुध्दिबळपटू मानस हाथी, दीप फुणगे, स्वरूप बेलेमकर, श्लोक पवार, मैत्रेयी बेरा आदींनी सलामीचे सामने जिंकले. १३ वर्षाखालील वयोगटात प्रथम मानांकित मानस हाथीने आक्रमक चाली रचत आयुष्मान चक्रवर्तीच्या राजाला १९ व्या मिनिटाला नमविले. माजी नगरसेवक सुनील अहिर, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते, फिडे बुध्दिबळ प्रशिक्षक राजाबाबू गजेंगी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले.

आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना सहकार्यीत बँक ऑफ बडोदा ट्रॉफी १३ वर्षाखालील बुध्दिबळ स्पर्धेत दुसऱ्या पटावर फिडे गुणांकित द्वितीय मानांकित दिवीत मोदीला दीप फुणगेने चकविले. वजीर व हत्तीच्या सहाय्याने दीप फुणगेने प्रतिस्पर्ध्याच्या राजाला २४ व्या मिनिटाला शह दिला आणि सनसनाटी विजयाची नोंद केली. अन्य सामन्यात फिडे गुणांकित स्वरूप बेलेमकरने ध्रुव यादवला, श्लोक पवारने जॉर्ज शेर्विनला आणि मैत्रेयी बेराने हुसैना राजला हरवून पहिला साखळी गुण वसूल केला. ७ वर्षाखालील गटात मेधांश बांगरने अभिष्ता चव्हाणचा, चैतन्या नगराळेने अनिश अगरवालचा तर १० वर्षाखालील गटात अहान कातारुकाने मंश टंकचा, ईशी सिंगने मीरा शेट्टीचा पराभव करून साखळी एक गुण मिळविला.

# भारताचा स्वातंत्र्यदिनी सनसनाटी विजय

## कांगारुंना शेवटच्या ओव्हरमध्ये लोळवत मालिका जिंकली

**वृत्तसंस्था**
■ **ब्रिस्बेन**

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असलेल्या वूमन्स इंडिया ए टीमने धमाका करत इतिहास घडवला आहे. भारतीय संघाने स्वातंत्र्य दिनी ब्रिस्बेनमध्ये झालेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात शेवटच्या ओव्हरमध्ये सनसनाटी विजय मिळवला. भारताने या सलग दुसऱ्या विजयासह मालिकाही जिंकली.



भारताने या विजयासह 3 सामन्यांच्या मालिकेत आता 2-0 अशा एकतर्फी फरकाने आघाडी घेतली. त्यामुळे भारताकडे आता तिसरा आणि अंतिम सामना जिंकून कांगारुंना क्लिन स्वीप करत टी 20 मालिकेतील पराभवाची परतफेड करण्याची संधी आहे. ऑस्ट्रेलियाने भारताला टी 20 मालिकेत 3-0 ने पराभूत केलं होतं.

भारताने दुसऱ्या वनडे सामन्यात 266 धावांचं आव्हान हे 1 बॉलआधी आणि 2 विकेट्स राखून पूर्ण केलं. भारताने 49.5 ओव्हरमध्ये 8 विकेट्स गमावून हे आव्हान पूर्ण केलं.

यास्तिका भाटीया आणि कर्णधार राधा यादव या जोडीने अर्धशतकी खेळी केली. तर प्रेमा रावत हीने अखेरच्या क्षणी नाबाद 32 धावा करत भारताला विजयी केलं. त्याआधी मिन्नू मणी हीने 3 विकेट्स घेत कांगारुंना मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखलं.

### पहिल्या डावात काय झालं?

ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकत बॅटिंगचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाने 50 ओव्हरमध्ये 9 विकेट्स गमावून 265 धावा केल्या. ऑस्ट्रेलियासाठी एलिसा हीली हीने सर्वाधिक 91 धावांचं योगदान दिलं. तर किम गार्थ हीने 41 धावा केल्या. मात्र त्या व्यतिरिक्त ऑस्ट्रेलियाच्या एकाही फलंदाजाला 30 पार पोहचता आलं नाही. भारतासाठी मिन्नू मणी हीने सर्वाधिक 3 विकेट्स घेतल्या. मिन्नूने फिरकीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांना बांधून ठेवलं. त्याचा फायदा भारताच्या इतर गोलंदाजांना झाला. सायमा ठाकोर हीने ऑस्ट्रेलियाच्या दोघींना आऊट केलं. तर तितास साधू, राधा यादव, प्रेमा रावत आणि तनुजा कंवर या चौघींनी 1-1 विकेट मिळवली.

### भारताचा थरारक विजय

भारताची विजया धावांचा पाठलाग करतान निराशाजनक सुरुवात राहिली. भारताची 6 बाद 157 अशी स्थिती झाली होती. यास्तिका भाटीया हीने सलग दुसरं अर्धशतक झळकावलं. यास्तिकाने 66 धावा केल्या. मात्र यास्तिकाला टॉप ऑर्डरमधील एकाही फलंदाजाकडून चांगली साथ मिळाली नाही. मात्र लोअर ऑर्डरमधील फलंदाजांनी भारताला विजयी करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. कर्णधार राधा यादव हीने 60 धावांची झुंजार खेळी करत भारताला संकटातून बाहेर काढलं. तनुजा कंवर हीने 50 धावा केल्या. तर प्रेमा रावतने नाबाद 32 धावा करत भारताला सलग दुसरा विजय मिळवून दिला.

# एमसीसीच्या इंग्लंड दौऱ्यात साहिल जाधव, अयाझ खान, देव जमूला चमकले

## आता इंग्लंडमध्येही ज्वाला सिंग यांची क्रिकेट अकादमी




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

क्रिकेट प्रशिक्षक ज्वाला सिंग यांच्या एम.सी.सी. (मुंबई क्रिकेट क्लब) च्या वतीने त्यांच्या अकादमीतील युवकांना इंग्लिश वातावरणात खेळण्याचा अनुभव मिळावा यासाठी ५० दिवसांच्या इंग्लंड दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यात त्यांचा १६ वर्षाखालील मुलांचा संघ आणि १९ ते ३० वयोगटातील मुलांचा संघ असे दोन संघ या दौऱ्यात सहभागी झाले होते. या दौऱ्यात ते २२ सामने खेळले आणि १८ सामने जिंकले आणि त्यापैकी केवळ चार सामन्यात त्यांना हार पत्करावी लागली. या सामन्यांमध्ये देव जमूला याने दोन शतकी खेळींसह ६०० धावा केल्या तर मुंबईचे साहिल जाधव आणि अयाझ खान या युवकांनी प्रत्येकी ४०० धावा करून आपण मोठ्या सामन्यात खेळण्यासाठी तयार असल्याचे दाखवून दिले आहे.

या दौऱ्यात ते विविध क्लब, एटन कॉलेज, हॅरो स्कूल, हॅम्पटन स्कूल, चेस क्रिकेट क्लब, स्टोर स्कूल अशा विविध संघांविरुद्ध सामने खेळले. या खेळाडूंना या दौऱ्यादरम्यान भारताचे माजी सलामीवीर वासिम जाफर तसेच मुंबई क्रिकेट क्लब चे संस्थापक संचालक विनायक सामंत आणि भारताचा सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि पृथ्वी शॉ यांचे प्रशिक्षक ज्वाला सिंग यांचे मार्गदर्शन लाभले.

### आता इंग्लंड मधेही ज्वाला सिंग यांची क्रिकेट अकादमी

प्रतिवर्षी आपल्या अकादमीतील मुलांसाठी इंग्लंड दौरा करणाऱ्या ज्वाला सिंग यांनी आता इंग्लंड मधील स्लाव्ह येथे ज्वाला तेज प्रताप सिंग क्रिकेट अकादमी या नावाने क्रिकेट अकादमीची सुरुवात केली आहे. दौऱ्यातील पहिले २० दिवस दोन्ही संघाना क्रिकेट सामन्यांचा अनुभव दिल्यानंतर ज्वाला सिंग यांनी स्लाव्ह क्रिकेट क्लबच्या सहकार्याने आणि एम.सी.सी.च्या प्रशिक्षकांच्या साहाय्याने ३० दिवसांचा हाय परफॉर्मन्स कॅम्प आयोजित केला होता. यात दौऱ्यावरील अकादमीच्या मुलांसोबत प्रामुख्याने इंग्लंडमधील युवा खेळाडूंचा देखील समावेश होता. भारतीय पद्धतीच्या क्रिकेटचे ज्ञान इंग्लिश खेळाडूंना देण्यासाठी या क्रिकेट अकादमीची स्थपणा करण्यात आली असून यात १६ वर्षाखालील तसेच हॅम्पशायर, सरे, केंट, मिडलसेक्स, बर्कशायर, यॉर्कशायर या कौंटी संघातील युवा खेळाडू आणि संयुक्त अरब अमिराती येथून देखील खेळाडू सहभागी झाले होते. भारताविरुद्ध इंग्लंडच्या १९ वर्षाखालील मुलांच्या संघाचे नेतृत्व करणारा हमजा शेख हा तर मुंबईत एम.सी.सी.च्या अकादमीत प्रशिक्षणासाठी खास दाखल झाला होता. अशा अकादमीच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करू शकतील असे खेळाडू घडविणे हेच आपले ध्येय असल्याचे ज्वाला सिंग यांनी म्हटले आहे.

# गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्याकरीता स्पर्धा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहेत.

शासन निर्णय क्र. पुलदे-२०२५/प्र.क्र.७४ (ई-११४४०९५)/सां.का. २, दिनांक २० जून, २०२५ या अन्वये शासनाकडून पुरस्कार देण्याचा निर्णय घेण्यात आला असून या स्पर्धेची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. या शासन निर्णयातील परिशिष्ट 'अ' मधील विहीत नमुन्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने, स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या mahotsav.plda@gmail.com या इमेलवर गणेश चतुर्दशीच्या एक दिवसापूर्वीपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

यंदाच्या गणेशोत्सवात उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्याकरीता स्पर्धा आयोजन करुन अभिप्रायासह गुणांकन करुन प्रस्तावास शासनास सादर करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून ही समिती गणेश मंडळाच्या उत्सवस्थळी प्रत्यक्ष भेट देणार आहेत. या जिल्हास्तरीय समितीकडून प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत अभिप्रायासह गुणांकन करण्यात येवून तीन गणेशोत्सव मंडळाची शिफारस करून त्यांची नावे सर्व कागदपत्र आणि व्हीडीओसह राज्य समितीकडे देण्यासाठी जिल्हाधिकारी मार्फत प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचेकडे सादर करतील.

या गणेशोत्सव स्पर्धेच्या निकालाचा दिनांक, सर्व विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा बक्षीस वितरणचा समारंभ कोठे व कसा करायचा याबाबत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय यांच्याकडून स्वतंत्र सूचना देण्यात येतील, असे मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# महानगरपालिकेच्या शाळांमध्ये 'संपर्क स्मार्ट शाळा' उपक्रमाचा शुभारंभ

## मराठी माध्यमाच्या १३५ शाळांमधील वर्गखोल्या झाल्या 'स्मार्ट'



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महाराष्ट्र राज्य आणि संपर्क फाउंडेशन यांच्या समन्वयाने विकसित झालेल्या 'संपर्क स्मार्ट शाळा' उपक्रमाचा शुभारंभ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १३५ शाळांमध्ये करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे महानगरपालिकेच्या शाळांमधील १८ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना दृकश्राव्य माध्यमातून शिक्षण मिळणार आहे. या उपक्रमामुळे शिक्षण विभागातील नवीन संकल्पनांच्या मदतीने प्रत्येक विद्यार्थी प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकणार आहे.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उप आयुक्त (शिक्षण) डॉ. प्राची जांभेकर, संपर्क फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विनीत नायर, संपर्क फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. के. राजेश्वर राव यांच्या प्रमुख उपस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात काल या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत संपर्क स्मार्ट शाळा उपक्रमाच्या माहितीपत्रकाचे, संपर्क दूरदर्शन संचाचे अनावरण करण्यात आले.

संपर्क फाउंडेशनचा हा उपक्रम देशातील ८ राज्यांमध्ये राबविण्यात येत आहे. एक कोटी ८० लाख विद्यार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचला आहे. महाराष्ट्रात १३ हजार शाळांमध्ये हा उपक्रम सुरू झाला आहे. पालिकेच्या परळ, दादर, भायखळा, घाटकोपर, चेंबूर, भांडूप, कुर्ला, सांताक्रूझ, गोरेगांव आणि बोरिवली येथील मिळून एकूण १३५ शाळांमध्ये हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. शिक्षकांच्या क्षमतांचा विकास करणे, अध्यापन पद्धती सोपी करणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे.

या उपक्रमात प्रत्येक शाळेसाठी एलईडी टीव्ही संच, २७३ दूरदर्शन संच, शिक्षकांसाठी स्मार्ट शाळा ॲप्लिकेशन, पाठ योजना, पाठ्यपुस्तकातील धड्यांवर आधारित २७०० व्हिडिओ, मूल्यमापनासाठी वस्तुनिष्ठ प्रकारातील ३० हजार प्रश्न आदी शैक्षणिक बाबींचा समावेश आहे. यासाठी महानगरपालिकेच्या २०० शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी म्हणाले, शिक्षणाची पुढची पायरी ठरणाऱ्या 'संपर्क स्मार्ट शाळा' उपक्रमात बृहन्मुंबई महानगरपालिका सहभागी झाली आहे. शिक्षण क्षेत्रातील हा आमूलाग्र बदल आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून आम्ही अनेक शाळांपर्यंत पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (एफएलएन) उपकरणे पोहोचविणार आहोत. ही उपकरणे वापरण्यास सुलभ असल्यामुळे शिक्षकांना त्याचा वापर करता येणार आहे. विद्यार्थ्यांना याचा थेट फायदा होणार आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षर करण्यास मदत होणार आहे. महानगरपालिका हा उपक्रम पुढे नेण्यास सक्षम आहे, असे गगराणी यांनी नमूद केले.

संपर्क स्मार्ट शाळा उपक्रमाचे संस्थापक अध्यक्ष विनीत नायर यांनी संपर्क स्मार्ट शाळा उपक्रमाचा विस्तार सांगितला. शैक्षणिक क्षेत्रात येत्या काळात या उपक्रमाद्वारे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती त्यांनी दिली.

# खा. रवींद्र वायकर यांनी केले श्याम नगर तलाव येथील 50 फुट उंच ध्वज स्तंभावर ध्वजारोहण




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील खासदारांना केलेल्या आवाहनानुसार भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत जोगेश्वरी पूर्व श्याम नगर तलाव येथे उभारण्यात आलेल्या ५० फूट उंच ध्वज स्तंभावर मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रवींद्र वायकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

जोगेश्वरी (पूर्व) येथील श्याम नगरात मिनी चौपाटी अशी ओळख असलेल्या लोकमान्य टिळक सार्वजनिक विसर्जन तलाव येथे जोगेश्वरी, गोरेगाव व अंधेरी येथील जनता मोठ्या प्रमाणात फेरफटका मारण्यासाठी येत असतात. त्या ठिकाणी तिरंगा राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. सकाळी ९ वाजता पार पडलेल्या ध्वजारोहण समारंभासाठी सहायक पोलिस आयुक्त पाटील, मेघवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक हुंबे, इस्माईल युसूफ महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्वाती व्हावळ, पालिका के - पूर्वचे सहाय्यक आयुक्त मिश्रा, पी - उत्तरचे सहाय्यक आयुक्त वळवी, मनीषा वायकर, माजी नगरसेवक राजू पेडणेकर, संजय पवार, रेखा रामवंशी, विभाग प्रमुख अल्ताफ पेवेकर, प्रियांका आंबोळकर, रचना सावंत, ज्ञानेश्वर सावंत, डॉ. राहुल महाले, डॉ. अमेय पोतनीस, मिलिंद कापडी, विविध महाविद्यालयातील एनएसएस व एनसीसीचे विद्यार्थी, शाखाप्रमुख, महिला पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महागाई भत्ता 53% वरून 55% लागू करण्याच्या शासन निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करावी

## महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेचे शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक यांना निवेदन

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

राज्य शासनाच्या वित्त विभागाने ११ ऑगस्ट २०२५ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, जानेवारी २०२५ पासून महागाई भत्ता ५३% वरून ५५% करण्यात आला आहे. वाढीव २% महागाई भत्ता थकबाकीसह ऑगस्ट २०२५ च्या वेतनासोबत देण्याचे आदेश स्पष्ट आहेत. मात्र मुंबईतील काही शिक्षण निरीक्षक कार्यालयांनी ऑगस्ट महिन्याची वेतन बिले वाढीव महागाई भत्ता आणि थकबाकी न समाविष्ट करता जमा करून घेतली आहेत. हे अन्यायकारक व शासन निर्णय विरोधी आहे.असे नमूद करून

महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेने शासन निर्णयाची तत्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक आणि संबंधित विभागीय शिक्षण निरीक्षकांना निवेदन सादर करून केली आहे.

वाढीव २% महागाई भत्ता थकबाकीसह ऑगस्ट महिन्याच्या वेतनात समाविष्ट करण्यात यावा, वाढीव महागाई भत्ता आणि थकबाकी वगळून सादर झालेली वेतन बिले तत्काळ reject करून, सुधारित बिलेच स्वीकारण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात. अशी मागणी करून संघटनेचे राज्याध्यक्ष तानाजी कांबळे यांनी सांगितले की, "शासन निर्णय स्पष्ट असून, राज्यातील एकही शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वाढीव महागाई भत्ता आणि थकबाकीपासून वंचित राहता कामा नये. या अनुषंगाने महागाई भत्ता आणि थकबाकी ऑगस्ट वेतन सोबत देण्याच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी तत्काळ व्हायलाच हवी."

# मुंबईतील गणेश मंडळाच्या विद्युत सुरक्षेसाठी अदानी इलेक्ट्रिसिटी आणि बृहन्मुंबई महापालिका भागीदारी




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

बहुप्रतिक्षित गणेशोत्सव जवळ येत असताना, अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (बीएमसी) आपत्ती व्यवस्थापन विभागासोबत सहकार्य करीत आहे, जेणेकरून मुंबईतील गणेश मंडळ स्वयंसेवकांसाठी आवश्यक विद्युत सुरक्षा प्रशिक्षण आयोजित केले जाईल. या संयुक्त प्रयत्नाचे उद्दिष्ट आगामी उत्सवांदरम्यान आपत्कालीन तयारीत लक्षणीय सुधारणा करणे आणि संभाव्य विद्युत धोके कमी करणे आहे.

या संयुक्त प्रयत्नात, अदानी इलेक्ट्रिसिटीचे सुरक्षा अधिकारी आणि बीएमसी आपत्ती व्यवस्थापन विभाग संपूर्ण मुंबईतील गणेश मंडळ स्वयंसेवकांसाठी 'प्रथम प्रतिसादकर्ता प्रशिक्षण कार्यक्रम' च्या मालिकेत सहभागी होत आहेत.याअंतर्गत आगामी सत्रे खार, सांताक्रूझ, चेंबूर, दहिसर आणि बोरिवली यासारख्या ठिकाणी आयोजित केली आहेत. या सत्रांमध्ये, अदानी इलेक्ट्रिसिटीचे तज्ज्ञ विद्युत सुरक्षिततेवर महत्त्वपूर्ण व्याख्याने देतील व स्वयंसेवकांना महत्त्वपूर्ण ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्ये प्रदान करतील.

या ३० मिनिटांच्या सत्रांमध्ये, अदानी इलेक्ट्रिसिटीचे अधिकारी अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करतात. त्यामध्ये उत्खनन सुरक्षा, योग्य भार आवश्यकतांची गणना करणे, उपकरणांचा योग्य आकार आणि वर्ग वापरणे, हवामानरोधक विद्युत साहित्य निवडणे, वितरण कंपनी जोडणीसाठी योग्य अनुप्रयोग, तात्पुरते विद्युत सेटअप मार्गदर्शक तत्त्वे, पाऊस किंवा ओल्या परिस्थितीसाठी खबरदारी, सुरक्षित वायरिंग पद्धती तसेच सार्वजनिक आणि स्वयंसेवक दोघांसाठीही एकूण आपत्कालीन आणि प्रकाश सुरक्षा यांचा समावेश आहे.

'आम्ही सुरक्षिततेची संस्कृती वाढवण्यासाठी खूप वचनबद्ध आहोत आणि या महत्त्वाच्या उपक्रमावर बीएमसी आपत्ती व्यवस्थापन विभागासोबत काम करताना आम्हाला खूप आनंद होत आहे', असे अदानी इलेक्ट्रिसिटीच्या प्रतिनिधीने सांगितले. 'आमचे ध्येय गणेश मंडळाच्या स्वयंसेवकांना आवश्यक ज्ञान आणि सर्वोत्तम प्रशिक्षण देऊन विद्युत व्यवस्था सुरक्षितपणे व्यवस्थापित करणे, सर्व भाविकांसाठी आनंददायी आणि घटनामुक्त उत्सव सुनिश्चित करणे आहे.'

कुर्लाचा महाराजा गणेश मंडळ, कुर्ला पश्चिम येथील प्रतिनिधी श्री. समीर पवार यांनी कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले की, 'हे विद्युत सुरक्षा प्रशिक्षण आमच्यासाठी अविश्वसनीयपणे मौल्यवान आहे. उत्सवादरम्यान मोठ्या प्रमाणात असलेल्या तात्पुरत्या विद्युत प्रतिष्ठापनांमुळे, योग्य प्रक्रिया आणि खबरदारी समजून घेणे आवश्यक आहे. आम्हाला हे महत्त्वाचे ज्ञान दिल्याबद्दल आम्ही बीएमसी आणि अदानी इलेक्ट्रिसिटीचे आभार मानतो.' अदानी इलेक्ट्रिसिटी आणि बीएमसी आपत्ती व्यवस्थापन विभाग सर्व गणेश मंडळांना या महत्त्वपूर्ण प्रशिक्षण सत्रांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करतो, जेणेकरून सर्वांसाठी सुरक्षित आणि यशस्वी गणेशोत्सव सुनिश्चित होईल.

# पोईसर जिमखाना येथे साजरा झाला स्वातंत्र्यदिन सोहळा

## गोपाळ शेट्टी यांनी केले ध्वजारोहण



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

कांदिवली येथील पोईसर जिमखाना येथे ७९ व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यानिमित्त एक भव्य समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी आणि बोरीवलीचे आमदार संजय उपाध्याय यांनी विशेष उपस्थिती होती.गोपाळ शेट्टी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी गोपाळ शेट्टी यांनी देशभक्ती आणि राष्ट्रीय एकतेवर हृदयस्पर्शी विचार मांडले, व उपस्थित नागरिकांना देशप्रेमाची जाज्वल्य प्रेरणा दिली.तसेच त्यांनी आपल्या देशाच्या समृद्ध इतिहासावर आणि स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या सैनिकांनी केलेल्या बलिदानावर प्रकाश टाकला.

यावेळी जिमखान्याचे अध्यक्ष मुकेश भंडारी, उपाध्यक्ष करुणाकर एस. शेट्टी , जयेश मोदी, चेतन शाह, मोहन परब, हसमुखभाई मकवाना, मयूर पर्यवेक्षक तसेच इतर अनेक समिती सदस्यांसह अनेक भाजपा पदाधिकारी आणि नेते उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका
जनहित परम् ध्येयम्
स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका

## मालमत्ता कर विभाग

अभय योजना

**केवळ एक वेळची विशेष व अंतिम बाब, करदात्यांसाठी सुवर्णसंधी !!!**

# अभय योजने अंतर्गत शास्ती माफीला मुदतवाढ

## मालमत्ता कर एकरकमी भरा व शास्तीवर सवलत मिळवा !

**१६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत शास्ती मध्ये ९०% सवलत.**

**१६ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत शास्ती मध्ये ७५% सवलत.**

कर MITRA
तुमच्या सर्व प्रश्नांचं समाधान एकाच ठिकाणी!

पनवेल महानगरपालिकच्या
panvelmc.org
या संकेतस्थळावर जाऊन नागरीक आता मालमत्ता कराच्या विविध सेवाकरीता "पीएमसी कर मित्र" या प्रणालीचा वापर करू शकतात.
मालमत्ता कराचा भरणा, तक्रारी, अभिप्राय व सुचना "पीएमसी कर मित्र" या चॅटबॉट च्या माध्यमातून नोंदविता येतील.
नागरिकांनी आता मालमत्ता कराच्या विविध सेवाकरीता रांगेत उभे न राहता ऑनलाईन स्वरूपात "पीएमसी कर मित्र" या प्रणालीचा वापर करावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्री. मंगेश चितळे यांनी केले आहे.

**चालू वर्ष २०२५-२६ करिता ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत कराचा संपूर्ण भरणा करा, ५% सूट हमखास मिळवा.**

**E-Bill स्वीकारा, डिजिटल भरणा करा वेळ वाचवा, २% सूट घेऊन बचत वाढवा!**

ऊर्जा बचत करा सौर शक्तीने, आणि करामध्ये घ्या २% सूट!

जल पुनःभरणाचा अवलंब करा, २% सूट सहज मिळवा!

घनकचरा शास्त्रोक्त पद्धतीने हाताळा, सवलतीचं दार उघडा आणि करात २% सूट मिळवा!

कचऱ्याची शिस्तबद्ध विल्हेवाट करा, मिळवा २% करामध्ये सवलत हमखास!

डिजिटल युगात स्मार्ट निर्णय पारंपरिक रांगा सोडा, PMC Tax App & Panvel Connect App वरून घरबसल्या कर भरा!

वेळ वाचवा, panvelmc.org वरून कर ऑनलाईन भरा आणि मालमत्ता करामध्ये सवलती मिळावा.

**मंगेश चितळे**
आयुक्त तथा प्रशासक,
**पनवेल महानगरपालिका**
स्वामी नित्यानंद रोड, गोखले हॉल जवळ पनवेल - 410206